# सरदार

## नियतकालिक

२०१९-२०



(कोरोना महामारीमुळे आर्थिक दूरगामी परिणाम)

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# सरदार वल्लभभाई पटेल

## कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

# शैक्षणिक वर्ष २०१९ – २०
# मधील क्षणचित्रे



राज्यस्तरीय भाषिक अल्पसंख्यांक केळी
उत्पादक शेतकरी परिषद कार्यशाळेच्या
उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना
मा.श्री. भागवतभाऊ पाटील (अध्यक्ष, ऐ.प.शि.प्र.मं.)



राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त भयमुक्त वातावरणात
कुठल्याही अमिषाला बळी न पडता मतदान
करण्याची शपथ घेतांना संचालक मंडळ,
प्राध्यापक आणि महाविद्यालयीन विद्यार्थी......



प्लॉस्टिक कचरामुक्त अभियानांतर्गत
स्वच्छता मोहिमेत श्रमदाना करतांना
महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक,
आणि विद्यार्थी....



आंतरविद्यापीठ खेळाडू बरकतुल्लाह विद्यापीठ
भोपाळ येथे क्रिकेट या खेळात विद्यापीठाचे
प्रतिनिधीत्व केल्यामुळे कु. अश्विनी तायडे
हिचा सत्कार करतांना संस्थेचे सचिव
मा.श्री. संजय वामन पाटील, प्राचार्य व प्राध्यापकवृंद

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

## सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

ता.रावेर, जि.जळगाव ४२५५०७ फोन – (०२५८४) २७१५४१

(भाषिक अल्पसंख्यांक महाविद्यालय)

सत्यमेव जयते

# सरदार

## वार्षिक नियतकालिक

### शैक्षणिक वर्ष

### २०१९–२०

### अंक २० वा

**····✻ संपादक मंडळ ✻····**

प्रा. एस.पी. उमरीवाड — प्रा. डॉ.के.जी. कोल्हे

प्रा. डॉ.पी.आर. महाजन — प्रा. डॉ.पी.आर. गवळी

प्रा. एम.के. सोनवणे — प्रा. व्ही.एन.रामटेके

**प्रकाशक**

प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने

**मुद्रक**

सोनल ऑफसेट अॅन्ड स्टेशनर्स, भुसावळ

या नियतकालिकातील प्रकाशित झालेल्या साहित्यातील मते संबंधीत लेखकांची / कवींची आहे. संपादक मंडळ आणि संस्था या मताशी सहमत असतीलच असे नाही.

(खाजगी वितरणासाठी)

# विद्यापीठ गीत

मंत्र असो हा एकच हृदयी 'जीवन म्हणजे ज्ञान'

ज्ञानामधूनी मिळो मुक्ती अन मुक्तीमधूनी ज्ञान ।।धृ ।।

कला, ज्ञान, विज्ञान, संस्कृती साधू पुरुषार्थ

साफल्यास्तव सदा 'अंतरी पेटवू ज्ञानज्योत'

मंगल पावन चराचरातून स्त्रवते अक्षय ज्ञान ।।१ ।।

उत्तम विद्या, परम शक्ति ही आमुची ध्येयासक्ती

शील, एकता, चारित्र्यावर सदैव आमुची भक्ती

सत्य शिवाचे मंदिर सुंदर, विद्यापीठ महान ।।२ ।।

समता, ममता, स्वातंत्र्याचे नांदो जगी नाते,

आत्मबलाने होऊ आम्ही आमुचे भाग्यविधाते,

ज्ञानप्रभुची लाभो करुणा आणि पसायदान ।।३ ।।

**कै. प्रा. राजा महाजन**

## ✻ आमचे प्रेरणास्थान ✻



लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल



# श्रद्धांजली



मागील शैक्षणिक वर्षात व आजपर्यंत सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, कला, सहकार, आदी विविध क्षेत्रातील दिवंगत झालेल्या थोर व्यक्ती, वीर जवान, शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, कवी, गायक, उद्योजक, खेळाडू, कलाकार, कृषीतज्ज्ञ, शेतकरी व कार्यकर्ते, जगभरात नैसर्गिक आपत्ती आणि अपघात इत्यादींमुळे प्राणास मुकलेल्या मानव जातीस, आपल्या संस्थेचे सभासद, हितचिंतक, कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय अशा अनेक ज्या व्यक्ती दिवंगत झाल्या त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन त्यांना आदरपूर्वक, भावपूर्वक श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

**भावपूर्ण श्रद्धांजली**

**कार्यमग्नता जीवन व्हावे मृत्यू ही विश्रांती !**

# प्राचार्यांचे मनोगत

**'सरदार'** नियतकालिकाचे विसावे पुष्प आपल्या समोर सादर करतांना मला मनस्वी खूप आनंद होत आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये २७ व्या वर्षात महाविद्यालयाने पदार्पण केलेले आहे गेल्या वीस वर्षांपासून **'सरदार'** नियतकालिक प्रकाशित करण्याचा उपक्रम नियमित सुरू आहे. एकोणवीस वर्षात त्यात कोणताही खंड पडलेला नाही. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचे अहवाल, विद्यार्थ्यांचे लेख, कथा, विनोद, कविता, सुविचार, स्फुटलेख वगैरे.... साहित्य **'सरदार'** नियतकालिकात प्रकाशित करीत असतो. वीस वर्षापासून **'सरदार'** नियतकालिक प्रकाशित करीत आहोत तेव्हापासून विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी आणि संस्थाचालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. त्यामुळेच आम्ही हा उपक्रम नियमित सुरु ठेऊ शकलो आहोत.

नॅक पुर्नमुल्यांकन समितीने महाविद्यालयात दि. २९ व ३० एप्रिल २०१९ रोजी भेट दिली. महाविद्यालय विद्यार्थीसाठी, समाजासाठी राबवित असलेल्या विविध उपक्रमांबाबत समितीने समाधान व्यक्त केले. १ मे २०१९ रोजी महाविद्यालयास नॅक पुर्नमुल्यांकनात ''ब'' दर्जा प्राप्त झाला.

रावेर तालुक्यात एम.एस्सी. (ऑरगॅनिक केमेस्ट्री) व एम.ए. अर्थशास्त्र हे अभ्यासक्रम अभ्यासण्याची सुविधा नसल्यामुळे २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून हे दोन्ही अभ्यासक्रम सुरु करण्यात आले. त्यासाठी आवश्यक सुविधा व्यवस्थापन मंडळ महाविद्यालयास पुरवित आहे. येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार आवश्यक ते अभ्यासक्रम जसे ऑनलाईन कोर्सेस, कौशल्य विकास अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरु करण्याचा मानस आहे. केळी अभ्यास व संशोधन केन्द्रामार्फत शेतकऱ्यांसाठी राज्य स्तरीय केळी परिषदेचे आयोजन करण्यात आले. रसायनशास्त्र विभागामार्फत राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

महविद्यालयातील प्राध्यापक आपल्या दैनंदिन कार्याबरोबरच संशोधनाचे कार्य करीत आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शोध पत्रिकेत आपले शोधनिबंध प्रकाशित करीत आहेत. विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यार्थिनी/विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास, स्वंयसिध्दा अभियान, जागतिक तापमान वाढ जाणीव जागृती कार्यशाळा, मैत्री कार्यशाळा, रोजगार कौशल्य विकास कार्यशाळा, राष्ट्रीय सुरक्षा कार्यशाळा, योग दिवस इ. उपक्रम तसेच राष्ट्रीय सेवा योजने मार्फत रा.से.यो दिन, महात्मा गांधी जयंती, महिला दिन, इ. तसेच विविध मंडळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन वर्षभरात करण्यात आले. या सोबतच वक्तृत्व स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा,रंगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, स्पर्धा परीक्षा, संगणकाविषयीची कार्यशाळा, स्नेह संमेलन, स्वच्छता मित्र, इ. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अभ्यासेतर उपक्रमाबरोबरच समाजोपयोगी अनेक उपक्रम उदा. रक्तदान शिबीर, पोलीओ लसीकरण मोहिम, साक्षरता रॅली, महिलांसाठी हळदी कुंकू, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता अभियान अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाने रांगोळी, वक्तृत्व, निंबंध, पोस्टर, पथनाट्य इत्यादी विविध स्पर्धांच्या माध्यमातून मतदार नोंदणी व जनजागृतीचे चांगले काम केल्यामुळे फैजपूर विभागीय कार्यालयाकडून कबचौ उमवि चे कुलगुरु मा.प्रा.पी.पी. पाटील, जळगाव जिल्हाधिकारी मा.अविनाश ढाकणे व फैजपूर विभागीय प्रांताधिकारी मा. अजित थोरबोले यांच्याहस्ते

उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरविण्यात आले. महाविद्यालयास पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल समन्वयक, सहभागी प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन! विशेष अभिनंदनीय बाब म्हणजे कु. अंकीता रमेश चौधरी हीने विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल २०१९ मधील परीक्षेत विद्यापीठ गुणवत्ता यादीत दुसरे स्थान पटकाविले आहे. शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात महाविद्यालय उल्लेखनीय कामगिरी करीत आहे. संस्थाचालकांचे कुशल मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मेहनती वृत्ती, आणि विद्यार्थ्यांची अभ्यासू व जिज्ञासू वृत्ती यामुळेच महाविद्यालयाने राबविलेल्या वर्षभरातील विविध उपक्रमांचे प्रतिबिंब म्हणजे **'सरदार'** नियतकालिक होय. आपल्या सूक्ष्मनिरीक्षणाने याचा आपणास प्रत्यय येईलच. प्रामाणिकपणे काम करीत असतांना काही त्रृटी निश्चित राहू शकतात. त्या त्रुटींचा स्विकार करुन भविष्यात त्या राहणार नाहीत अशी ग्वाही प्राचार्य म्हणून मी देऊ इच्छितो. नियतकालिक प्रकाशित करण्याकरिता व्यवस्थापनाचे अनमोल असे मार्गदर्शन लाभत असते त्यांचे मी आभार मानतो. संपादक मंडळाची मेहनत, सोनल ऑफसेट ॲन्ड स्टेशनर्स, भुसावळ यांचे अचूक मुद्रण यामुळेच हा अंक आम्ही वेळेत आपल्या हाती देऊ शकलो.

**प्राचार्य**
**डॉ. जे. बी. अंजने**



# संपादकीय.....

शैक्षणिक वर्ष २०१९–२० या वर्षाचे प्रतिबिंब **'सरदार'** नियतकालिकाच्या माध्यमातून आपणासमोर सादर करीत असतांना संपादक मंडळाला अत्यंत आनंद होत आहे.

महाविद्यालयाच्या स्थापनेला या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण **२७ वर्ष** पूर्ण झालेली आहेत. या कालावधीत प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने व व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून गरुड झेप घेतली आहे. महाविद्यालय ग्रामीण भागामध्ये ज्ञानदानाचे कार्य करीत असले तरी तेथील विद्यार्थी व प्राध्यापकवृंद हे इंटरनेटच्या माध्यमातून संपूर्ण जगाशी जोडले गेलेले आहेत. महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास विभाग हा विद्यापीठाच्या विविध योजना महाविद्यालयीन स्तरावर राबवित असतो, त्यामुळे त्यांचा शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास होत असतो. राष्ट्रीय सेवा योजना, युवती सभा इ. च्या माध्यमातून विद्यार्थी घडविण्याचे कार्य केले जाते. विविध समित्या, मंडळे नेहमी कृतीशिल असतात. महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या विविध योजना व कार्यक्रम यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग हा उल्लेखनीय असतो. महाविद्यालय विद्यार्थ्यांस शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू व समाजव्यवस्थेचा कणा मानते. त्यासाठी व्यक्तिमत्व विकासा राष्ट्रीय सेवा योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन इ. उपक्रम सक्षमपणे राबविले जातात. या सर्व उपक्रमांचा अहवाल तथा आरसा म्हणजेच 'सरदार' नियतकालिक होय.

पुढील कार्यास शुभेच्छा...!

**संपादक मंडळ**

---

**मुखपृष्ठाविषयी थोडेसे –**

'कोरोना विषाणूंच्या प्रार्दुभावाने सारे विश्व वित्तीय व आर्थिक संकटात सापडले आहे. मानवाचे सार्वजनिक स्वास्थ संकटात सापडले आहे. कोरोना योध्दे जसे डॉक्टर, नर्सेस, आशा वर्कर्स, पोलिस, शासन यंत्रणा मात्र मानवाला सावरण्यासाठी व अर्थचक्राला गती देण्याचा प्रयत्न करत आहेत. हे सांगण्याचा प्रयत्न मुखपृष्ठातून करण्यात आलेला आहे. '

**मुखपृष्ठ संकल्पना – कु. वैष्णवी अशोक पाटील**

# - ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ -

## * पदाधिकारी व संचालक सदस्य *



श्री. भागवत विश्वनाथ पाटील
(अध्यक्ष)



श्री. युवराज विठ्ठल पाटील
(उपाध्यक्ष)
(मृत्यु दि.२१/२/२०२०)



श्री. श्रीराम नारायण पाटील
(चेअरमन)



श्री. संजय वामन पाटील
(सचिव)



श्री. हरी भिका पाटील
(संचालक)



श्री. सुदेश एकनाथ पाटील
(संचालक)



श्री. प्रविण गंभीर महाजन
(संचालक)



श्री. जगन्नाथ शामु पाटील
(संचालक)



श्री. रामदास नारायण महाजन
(संचालक)



श्री. प्रल्हाद मधुकर पाटील
(संचालक)



श्री. विकास दत्तात्रय महाजन
(संचालक)



श्री. नरेंद्र विठ्ठल पाटील
(संचालक)



श्री.डॉ. सतिष पाटील
(संचालक)



श्री. विजय जगन्नाथ पाटील
(संचालक)



श्री. पी.आर. चौधरी
(संचालक)



श्री. आर.एस. पाटील
(सह सचिव)



प्रा. डॉ. जे. बी. अंजने
(प्राचार्य)

# * महाविद्यालय विकास समिती *



श्री. भागवत विश्वनाथ पाटील
(अध्यक्ष)



श्री. संजय वामन पाटील
(सदस्य)



श्री. पांडूरंग बाजीराव पाटील
(सदस्य)



श्री. डॉ. गंभीर रामू पाटील
(सदस्य)



श्री. वासुदेव हरी पाटील
(सदस्य)



श्री. प्रविण गंभीर महाजन
(सदस्य)



प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने
(पदसिद्ध सचिव)



प्रा.डॉ. एस.एन. वैष्णव
IQAC (समन्वयक)
(रसायन शास्त्र विभाग प्रमुख)



प्रा. एन. यू. बारी
(सदस्य)
शिक्षक प्रतिनिधी



प्रा.डॉ. पी.आर. गवळी
(सदस्य)
शिक्षक प्रतिनिधी



डॉ. श्री. के. जी. कोल्हे
(सदस्य
(पदार्थ विज्ञान विभाग प्रमुख)



प्रा.डॉ. नीता एस. वाणी
(सदस्य)
(महिला शिक्षक प्रतिनिधी)



श्री. नितीन पी. महाजन
(सदस्य)
शिक्षकेत्तर प्रतिनिधी

# विशेष अभिनंदन



प्रा.डॉ. सचिन नामदेव झोपे
यांना क.ब.चौ. उ.म.वि. जळगांव कडून पीएच.डी. प्राप्त
पीएच.डी. विषय : '' प्रसार माध्यमांचा खेळाडूंवर
होणाऱ्या परिणामांचा अभ्यास''



कु. चौधरी अंकिता रमेश
कबचौ उमवि जळगांव मार्च/एप्रिल २०१९
परीक्षेत विद्यापीठातून संगणक शास्त्र या
विषयातून दुसरे स्थान पटकाविले.

# महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी



कु. चौधरी अंकिता रमेश
तृतीय वर्ष विज्ञान (संगणकशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. कवरे शितल ईश्वर
तृतीय वर्ष विज्ञान (रसायनशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. पाटील योगिता तुकाराम
प्रथम वर्ष विज्ञान
प्रथम क्रमांक



कु.महाजन श्वेता पांडुरंग
द्वितीय वर्ष विज्ञान
प्रथम क्रमांक



मोंडाळे पवन नंदलाल
प्रथम वर्ष कला
प्रथम क्रमांक



कु. बारी निकिता बाळू
द्वितीय वर्ष कला (मराठी)
प्रथम क्रमांक



कु. पाटील निकिता नितीन
द्वितीय वर्ष कला (अर्थशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. सोनवणे लक्ष्मी राजू
द्वितीय वर्ष कला (इतिहास)
प्रथम क्रमांक



कु. गायकवाड मनोहर बाळू
तृतीय वर्ष कला (मराठी)
प्रथम क्रमांक



कु. चौधरी अश्विनी देवराम
तृतीय वर्ष कला (अर्थशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. महाजन विशाल ईश्वर
एम.ए.(मराठी)
प्रथम क्रमांक



कु. महाजन श्वेता पांडुरंग
उत्कृष्ट ग्रंथालय वाचक
प्रथम क्रमांक

## जिमखाना विभाग (विद्यापीठ खेळाडू)



कु. तायडे अश्विनी किशोर
क्रिकेट
आंतरविद्यापीठ खेळाडू
बरकतुल्लाह विद्यापीठ भोपाळ



पाटील मयुर गोपाळ
सॉफ्टबॉल
योगी वेमना विद्यापीठ
आंध्रप्रदेश



महाजन सचिन ईश्वर
बेसबॉल
आंतरविभागीय खेळाडू
शहादा



हर्षद खान सलमान खान
क्रिकेट
आंतरविभागीय खेळाडू
नंदूरबार

# महाविद्यालयाच्या वाटचालीतील क्षण चित्रे...



महाविद्यालयात सहजयोग ध्यान शिबिरामध्ये योगसाधनेत मग्न झालेले महाविद्यालयीन विद्यार्थी.....

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिरात मौजे धामोडी येथे स्मशानभूमीत स्वच्छता करतांना महाविद्यालयीन स्वयंसेवक...





विद्यापीठस्तरीय विभागीय युवक महोत्सव- 'युवारंग' कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे सहभागी टीम.......

स्वयंसिध्दा अभियाना अंतर्गत कराटे शिबिरामध्ये प्रशिक्षण घेतांना विद्यार्थिनी



# महाविद्यालयाच्या वाटचालीतील क्षण चित्रे...



महाविद्यालयात बेटी बचाव बेटी पढाओ अभियानांतर्गत मार्गदर्शन करतांना राष्ट्रीय प्रचारक डॉ.श्री.राजेंद्र फडके

युवती सभा अंतर्गत व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत विद्यार्थीनींना मार्गदर्शन करतांना प्राचार्या डॉ. अरुणाताई शिरीष चौधरी सोबत व्यासपिठावर मान्यवर...





राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिरात मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने व्यापीठावरील मान्यवर व विद्यार्थी...

हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यातर्फे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करतांना एच.पी.सी.एल. चे अधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी...



# महाविद्यालयाच्या वाटचालीतील क्षण चित्रे...



गांधी विचार संस्कार परीक्षेत जिल्ह्यातून तृतीय क्रमांक मिळविल्यामुळे कु. वैष्णवी अशोक पाटील हिचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने व प्राध्यापक वर्ग...



महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे पुस्तक प्रदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने, ग्रंथपाल प्रा. संदिप साळुंके, प्राध्यापक वृंद व विद्यार्थी....



राष्ट्रीय मतदान आणि मतदार जनजागृती कार्यक्रमात रांगोळी स्पर्धेचे निरीक्षण करतांना संस्थेचे संचालक मंडळ व प्राचार्य



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिरात पथनाट्य सादर करतांना रा.से.यो.चे स्वयंसेवक

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | लेख/कविता | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठी विभाग | १५ ते ३५ |
| २ | हिंदी विभाग | ३६ ते ४० |
| ३ | इंग्रजी विभाग | ४१ ते ४५ |
| ४ | अहवाल विभाग | ४६ ते ८८ |




# मराठी विभाग

माझी माय सरसोती
माले शिकवते बोली
लेक बहिनाच्या, मनी
किती गुपीतं पेरली

*

माझ्यासाठी पांडुरंगा
तुझं गीता भागवत
पावसात सामावतं
माटी मधी उगवतं



**कवयित्री बहिणाबाई चौधरी**

# सहलीचा वृत्तांत

महाविद्यालयीन जीवन म्हटले म्हणजे त्यामध्ये मजा–मस्ती तर आलीच ना... हा काळ प्रत्येकाच्या आयुष्यातील सुवर्णकाळ असतो असे म्हटले तरी चुकीचे नाही. या जीवनात गॅदरींग, कॉलेजमधील विविध कार्यक्रम, दंगा–नाच–गाणी, सहली या गोष्टी ओघाने येतातच. या सर्व गोष्टीत सहल हा अविस्मरणीय अनुभव असतो. याच अनुभव घेण्यासाठी आम्ही सर्व सज्ज झालो होतो. त्यात सोबत होती आमच्या लाडक्या जीवाभावाच्या मित्र–मैत्रिणी आणि प्रा. हिरोळे सर, प्रा. सोनवणे सर, प्राध्यापिका वैशाली मॅम आणि पुजा मॅम यांची ......सहलीचे ठिकाण तर पूर्वनियोजित होते ते म्हणजे आपल्या जवळील अजिंठा लेणी.

सहलीला जाण्यासाठी गाडीची व्यवस्था उत्तम प्रकारची होती, शनिवारचा दिवस होता, वातावरणात थोडी थंडी–थोडी गर्मी होती. म्हणजेच एकंदरीत गुलाबी थंडी होती. एक अविस्मरणीय अद्‌भूत क्षण अनुभवण्यासाठी आम्ही रवाना झालो ते सकाळी ८ वाजता.....मगं पुढे काय नूसती मजा गाडीत आम्ही सर्व मिळून १२ जण होतो. गाडीतील ते सुमधूर संगीत, बाहेरुन येणारी थंड हवा वातावरणात अजूनच आनंद मिसळत होती.

आम्ही ऐनपूर ते अजिंठा प्रवास साडेतीन तासात पूर्ण केला. त्यात आम्हाला साथ दिली ते आपल्या महाराष्ट्राचे वैभव असणाऱ्या काही डांबरी तर काही कच्चया–खडकाळ रस्त्यांनी. सकाळी १०.३० आम्ही तेथे पोहोचले, मग काय नूसती मज्जा. तेथे खाली उतरुन आम्ही घाट चढण्यासाठी सरकारी वाहनाचा उपयोग केला. त्यातून घाटाचे सौंदर्य सर्वांनी न्याहाळले. त्या उंच–उंच दऱ्या आम्हाला खुणावत होत्या, निसर्गाच्या हाकेला हो देण्यासाठी.

सरकारी गाडीतून उतरल्यानंतर आम्ही लेण्यांचे दर्शन घेण्यास सुरुवात केली. लेण्यांबद्दल सखोल माहिती देण्यासाठी आमच्यासोबत इतिहासाचे प्राध्यापक हिरोळे सर होतेच त्यांनी लेण्यांचा शोध कसा लागला ते सांगितले जॉन स्मिथ हा शिकारीसाठी जंगलात आला. तो उंच भागावर उभा असतांना त्याला खालील भागात एका बोगद्यातून एक वाघ आत–बाहेर करत आहे, असे दिसले, त्यातूनच त्याची जिज्ञासा वाढली. त्याने तेथे येवून शोध घेतला. तेव्हा त्याला तेथे एक लेणी दिसली ती लेणी म्हणजे १० नंबरची लेणी. मग त्याने निजामाला आणि ब्रिटीशांना माहिती दिली. मग ब्रिटिशांनी व निजामाने या लेण्यांचा पूर्ण शोध घेतला. त्या लेण्या  पूर्णपणे मातीने दाबल्या गेल्या होत्या. या लेण्यांचा पूर्ण शोध लागायला ७०० ते ८०० वर्ष लागली.

अजिंठा लेण्या ह्या आपल्या महाराष्ट्राचे वैभव आहेत. या लेण्यांची रचना अतिशय सुंदर आकर्षक़ आहेत. या लेण्यांत अनेक आकर्षक चित्र कोरलेले आहेत. प्रा.हिरोळे सरांनी आम्हाला पहील्या लेणीपासून शेवटच्या लेणीपर्यंत सर्वांचे महत्व व आकर्षकता यांची माहिती सांगितली. प्राचीन काळातही आजच्या काळातील आधुनिक दागदागिने, पैठण्यांवरील नक्षीकाम व वस्त्राची झलक तेथील लेण्यांच्या कोरीवकामात दिसून येते. त्याविषयी सरांनी आम्हाला पूर्ण माहीती दिली.

लेण्या पाहण्यात आम्ही एवढे गुंग झालो होतो की आम्हाला जेवणाचेही भान राहीले नाही. असो एक–एक लेणी पाहत पाहत आम्ही शेवटच्या लेणीपर्यंत पोहोचले. शेवटच्या लेणीत गौतम बुद्धांची समाधी अवस्था दर्शविली आहे, म्हणजेच बुद्धांचे महापरिनिर्वाण दाखवले आहे. याच लेणीत गौतम बुद्धांची सर्वात मोठी मूर्ती आहे. प्रत्येक लेणीत गौतम बुद्धांच्या जीवनाविषयी माहिती दर्शविली आहे. कोठे भिक्षू अवस्थेत, कोठे राजवस्थेत, कोठे समाधीअवस्थेत अशा प्रकारे दर्शविल्या आहेत. शेवटी शेवटच्या लेणीत आम्ही हिरोळे सरांच्या मार्गदर्शनाने आम्ही संपूर्ण लेण्यांतील मूर्तीपेक्षा

अगदी लहान म्हणजे ६ इंचाची गौतम बुद्धांची मूर्ती शोधली. पूर्ण लेण्या पहायला आम्हाला ५ वाजले. त्यानंतर आम्ही खाली उतरलो, जेवण उरकले, लेण्या पाहून आमचे मन एवढे प्रफुल्लित झाले की जेवण सुद्धा आम्हाला गोड लागत नव्हते.

शेवटी आम्ही जेवण करुन तेथून निघालो. रस्त्याने येतांना आम्ही मजा-मस्ती करत रस्ताने गाण्यांच्या मधूर-दंग्यात मग्न होवून गप्पा-टप्पा करत जळगावला रात्री ९ वाजता घरी पोहोचलो.

हा दिवस आमच्या आयुष्यातील अविस्मरणीय आणि अद्भूत दिवस होता. हा दिवस मी कधीही विसरु शकणार नाही.

**विद्या गणेश चौधरी**
(एफ.वाय.बी.ए.)

---

# सहलीचा अनुभव/ वृत्तांत

कॉलेजचे जीवन कसे असते ? यावर चर्चा करणे म्हणजे मनाला आनंद मिळतो. या जीवनातील एक अद्भूत क्षण म्हणजे सहल.... सहल शब्द कानावर पडला की मन आनंदाने नाचू लागते. अशी मजा, मौज, मस्ती व ऐतिहासिक जगाचा मागोवा घेण्यासाठी आम्ही एक दिवस एकत्र जमलो. मग आम्ही १५ ते १६ विद्यार्थ्यांनी ठरवल की आम्ही सर्वांनी मिळून शिवाजी महाराजांची जयंती जवळ येत आहे मग आपण सर्वांनी मिळून एखाद्या किल्लाला भेट द्यायची. मग त्यासाठी आम्ही आमच्या जवळच असलेल्या बऱ्हाणपूर जिल्ह्यातील आशीरगढ़ या किल्ल्यावर भेट द्यायला जायचं.

मग आम्ही त्यासाठी ९ फेब्रुवारी हा दिवस ठरवला. ठरवलेल्या दिवशी आम्ही सकाळी ७ वाजताच कॉलेजजवळ जमलो. आम्ही एकुण १५ विद्यार्थी होतो. आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी आमच्याबरोबर प्रा. अर्जून सर होते. आम्ही सकाळी ७ वाजता निघालो. रस्त्याने मजा-मस्ती करत गाण्यांची मैफील सजवत आम्ही १० वाजता तेथे पोहोचले.

आशिरगडला पोहोचताच आम्ही गाडीत असतांनाच बाहेरचे सौंदर्य न्याहाळत तेथे उतरलो. उतरल्यानंतर आम्ही तेथे किल्ला चढण्यासाठी तयार झालो. त्या किल्ल्याची भव्यता बघून व इतक्या वर्षापर्यंत त्या किल्याची मजबूत बांधा बघून आम्ही द्विकल्पीत झालो. तेथे नमूद केलेली माहीती आम्ही लक्षपूर्वक वाचत होतो. तेथे आम्हाला काही गोष्टी समजण्यात अडचणी येत होत्या, तेथे आम्ही सहयोगी प्राध्यापकांकडून माहिती प्राप्त करत होतो. तेथे प्रथम आम्ही आशादेवी मंदीरात दर्शन घेतले व आमचे मन प्रसन्न झाले.

या सहलीत जाण्याचा आमचा मुख्य उद्देश म्हणजे ऐतिहासिक वास्तूचे निरीक्षण करणे मग आम्ही गडावर चढायला सुरुवात केली. हा परीसर साधारणत: २ ते ४ किमीचा होता. आम्ही वर चढू लागलो. आम्ही बघितल आपल्या देशांत तो किल्ला किती विचारपूर्वक बांधला असावा. तिथे मावळ्यासोबत जे घोडे किंवा राजांचे घोडे असत त्यांना बांधण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था होती. आणि अजूनही ते स्थान अनेक आक्रमणानंतर शाबूत आहेत. तर चारही

बाजूंनी तटबंदी, दारुगोळा किंवा इतर शस्त्र लपवून ठेवण्यासाठी लहान आकाराच्या कुंड्या आणि सर्वात महत्वाचे म्हणजे तिथे असलेल महादेवाचं जागृत मंदीर, तिथे प्राचीन काळापासून अशी मान्यता आहे की महाभारतातील अमर यौद्धा अश्वत्थामा हा तिथे रोज महादेवाच्या पिंडीची पूजा करुन जातो.

हे सर्व बघून आम्ही जेवण केले आणि मग आम्ही तेथून ३ वाजता निघाले. नंतर आम्ही इच्छापूर या ठिकाणी असलेल्या इच्छादेवी मंदीराला दर्शन घ्यायला गेलो. हे एक जागृत देवस्थान आहे. तेथील सुंदर असा नयनरम्य परीसर बघितला.

थोडक्यात सांगायचे झाले तर या प्रवासात आम्ही ऐतिहासिक वारसा असलेल्या किल्ल्याची माहिती घेतले आणि अनेक नविन गोष्टी माहित झाल्या. आम्ही सर्व विद्यार्थ्यांनी सहलीचा मनसोक्त आनंद घेतला. मग आम्ही तेथून निघालो व ५ वाजेपर्यंत कॉलेजला पोहोचलो व तेथून घरी गेलो.

**साक्षी चंपालाल महाजन**
(एफ.वाय.बी.ए.)

---

# प्रसारमाध्यमातील स्त्रियांची प्रतिमा

सर्व प्रसार माध्यमे तंत्र दिवसेंदिवस विकसीत होत आहेत. प्रसार माध्यमचा उपयोग अधिकाधिक लोक करीत आहेत. त्यात स्त्रियांचा हिस्सा मोठा आहे. उद्योग जगात जाहिरातीच्या माध्यमातुन स्त्रियांची कामुक प्रतिमा प्रस्तृत करुन आपल्या नैतिक मूल्यांना पायदळी तुडवून मोठा नफा कमावला जातो. स्त्री देहाचे प्रदर्शन करुन, त्याचे बाजारीकरण करुन या जाहीरात संस्था आपले आणि ग्राहकांचे हित साधत आहेत. एका बाजुला स्त्रीसौंदर्याचे विकृत स्वरुप तर दुसऱ्या बाजुला मुनष्याच्या उच्चस्तरीय क्षमतांना कुंठीत करुन ग्राहकाला जाळ्यात अडकवण्याचे कारस्थान रचले जात आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेचा स्वीकार करणाऱ्या विकसनशील देशानी स्वत:ला बहुराष्ट्रीय कंपन्या, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय मुद्राकोष यांचा स्वाधीन केले आहे. सर्वत्र उपभोगवादी संस्कृती फोफावल्यामुळे यांचा सर्वात जास्त फायदा जाहीरात क्षेत्राला झालेला आहे. जाहीरातीचे हे माध्यम इतके प्रभावी बनले आहे की, प्रत्येक व्यक्तीला आणि व्यावसायिक क्षेत्राला त्याने आपल्या मुठीत ठेवले आहे. पूर्वी वर्तमानपत्रे, रेडिओ, दुरदर्शन या माध्यमांना खुबीने वापर केला जायचा. आणि सोशल मीडिया एक तत्पर आणि प्रभावी माध्यम बनले आहे.

या प्रसार माध्यमांत लोकांवर प्रभाव पाडणारे माध्यम म्हणजे सिनेमा, स्त्रिया बाहेर पडल्या कलाक्षेत्रात चमकू लागल्या परंतु कुठेही त्याच्यातल्या दुय्यम भूमिकेचे त्यांचे इतरांचे भान सुटत नाही. विकसीत होत जाणाऱ्या प्रसार माध्यमांतून स्त्रींची प्रतिमा, व्यक्तिमत्व विकसीत होणे दूरच उलट एक मालकीची वस्तु म्हणून तिचे जाहिररित्या प्रगटीकरण केले जाते. स्त्रियांची प्रसार माध्यमात खरंच खूपच प्रगती केली आहे. प्रत्येक सिनेमा, सिरियल सगळ्यामध्ये स्त्रियांचे स्थान जास्त दिसुन येते. चित्रपटात एखादी स्त्री साडी घालुन खुप दागिने घालुन नटलेली असे वर्णन केले जाते. बहुतेक ॲड्समध्ये स्त्रीयांचे स्थान मोठ्या प्रमाणात आहे. एकीकडे स्त्रीयांना स्वतंत्र मिळाले आहे पण दुसरीकडे

खेडेगावात त्यांना शिक्षणाचा अधिकार नाही. त्याचे घरचे त्यांना प्रोत्साहन देत नाही. स्त्रियांना खेडेगावात कमी दर्जा दिला जातो.

आज जाहिरात आणि स्त्री हे जणू समीकरण बनले आहे. जाहीरातीत महिलांच्या प्रतिमेचे आणि देहाचे ज्या कामुक तऱ्हेने प्रसारण केले जाते, त्याला समाजातून मोठा विरोध होत आहे. कोणत्याही स्त्रीची शारिरीक संरचना अमर्यादित ढंगात प्रस्तुत करणे, अनावश्यक रुपात दाखवणे ज्यातून प्रतिकुल प्रभाव पडेल आणि स्त्री समुदयासाठी अ–सन्मानजनक आणि अपमानकारक असेल, तथा समाजात अनैतीक वातावरण पसरायला चालना मिळेल अशा गोष्टीचा समावेश असलेल्या जाहिरातीवर पूर्ण बंदी आहे.

तरीही उद्योग जगात जाहिरातींच्या माध्यमांतून स्त्रियांची कामुक प्रतिमा प्रस्तुत करुन आपल्या नैतीक मूल्यांना पायदळी तुडवून मोठा नफा कमावला जातो. स्त्री देहाचे प्रदर्शन करुन, त्यांचे बाजारीकरण करुन या जाहिरात संस्था आपले आणि ग्राहकांचे हित साधत आहे. एका बाजुला स्त्रीसौंदर्याचे विकृत स्वरुप तर दुसऱ्या बाजुला मनुष्याच्या उच्चस्तरीय क्षमतांना कुंठीत करुन ग्राहकाला जाळ्यात अडकवण्याचे कारस्थान रचले जात आहे. हॉलिवूड सिनेमांचे अनुकरण करण्याच्या नादात हिंदी सिनेमाने भारतीय स्त्रीला देहप्रदर्शनाने बाहुले बनवले आहे. आधुनिकता, कथेची आवश्यकता, या नावाखाली ही कीड आता दक्षिणात्य सिनेमाबरोबर मराठी सिनेमालाही लागत आहे.

साडी, दागिणे तथा सौंदर्य प्रसाधनांच्या जाहिरातीत स्त्रीला आकर्षक सौंदर्यांच्या रुपात दाखवने स्वाभाविक आहे परंतु शेव्हिंग क्रिम, टायर, पुरुषांचे कपडे इत्यादी वस्तुच्या जाहीरातीत स्त्रीयांचा सहभाग अनेक प्रश्न निर्माण करतो. म्हणजे स्त्रीयांना प्रसार माध्यमात कशा प्रकारे दाखवतात त्यांची प्रतिमा कशी आहे हे आपल्याला कळते. आज अनेक ठिकाणी रस्त्याच्या बाजूला स्त्री–पुरुषांच्या अंर्तवस्त्राच्या जाहिरातीतील अर्धनग्न स्त्री–पुरुषाच्या छायाचित्रांचे मोठे (बॅनर) फलक झडकवत असतात.

जाहिरातींच्या जगाचे, स्त्रियांच्या प्रतिमेचे बारकाईने विशेषन केले तर ते दोन स्तरांवर करता येईल. एक म्हणजे घरी सर्वाची काळजी घेणारी व दुसरी आधुनिक जगातली म्हणजे आजची. त्यातही माध्यमांमधली स्त्रिंची प्रतिमा ही कायम वादातीत राहीली आहे. एकीकडे भारतीय संस्कृती जपणारी, कुटूंबाची काळजी घेणारी, प्रत्येकाला आधार देणारी आणि प्रसंगी दुर्गा होणारी अशी स्त्री दाखवली जाते तर दुसरीकडे त्यांच स्त्रियांच्या देहाचे उत्तान प्रदर्शन सौंदर्याच्या नावाखाली केलं जातं.

माध्यमांचा एवढा पगडा आपल्या मनावर इतका जबरदस्त आहे की या दोन टोकांच्या भुमिकांमध्ये आपली भारतीय स्त्री अडकली आहे. या सगळ्यामध्ये तिच्या वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यावर होत असतो. या खोट्या स्त्रीप्रतिमेला भेदून बाहेर पडलेलीच स्त्री आयुष्यामध्ये काही करु शकते. पण हा लढा तेवढा सोपा नसतो आणि असे संघर्ष माध्यम कधीच दाखवत नाही. प्रसारमाध्यमांत  महिलांना त्याचं शरीर हे म्हणजे केवळ एक उपभोग्य वस्तु असल्याचं भासवलं जात. अगदी शिकलेल्या महिलांना त्यांच्या कामापेक्षा त्यांच्या दिसण्यावर, कपडे घालण्यावर आणि मेकअप करण्यावर त्यांची चर्चा करण्यात येते.

जाहिरातीमध्ये आणखी एक मोठा भाग हा सौंदर्यप्रसाधनाचा असतो. गोर दिसणारी क्रिमसाठी स्त्रियांना वेगवेगळ्या प्रकारे सांगण्यात येते. त्यात स्त्रिची प्रतिमा ही जाहीरातीमध्ये फार दुर्दम्य स्वरुपात दाखवली आहे. तस पाहील तर टिव्ही, न्युजपेपर, मॅग्झीन या सर्वात स्त्रीयांची प्रतीमा ही खुप वाईट प्रकारे दाखवता कारण त्यांना त्यांच्या नफा मिळवण्यासाठी व आपले वस्तु विकण्यासाठी ते स्त्रीयांचे प्रतीमा ही कशीपण दाखवायला तयार असतात. पण आजची स्थिती तर अशी आहे की, ज्या Advertisment मध्ये जेव्हा फक्त पुरुष असत आता ते जास्त

विकण्यासाठी ते Advertisment महिला करतांना दिसत आहेत. आणि आता माहितीचे आणि संदेशाचे वहन इतके जलदगतीने होत आहे की, १ सेकंदापूर्वी, २ मिनीटांपूर्वी काय घडले त्यांच्या अपडेट टि्वटर किंवा फेसबुक किंवा व्हॉट्सअॅप यासारख्या सोशल साईट्सवरुन त्वरित प्रसारित होत असतात.

प्रसारमाध्यमामध्ये टिव्ही आणि SocialMedia मुळे स्त्रियांच्या प्रतिमेची एक वेगळी ओळख झाली आहे. आणि स्त्रियांना दुय्यम असे प्रसारमाध्यमामध्ये स्त्रीची प्रतीमा आहे. आणि त्यांच्या मध्ये त्यांना दाखवण्यावर कोणाला प्रतिबंद असतात. स्त्रियांना एकदम दुय्यम दाखवले जाते त्यांच्या कपडे, क्रीम, सौंदर्याची साधने अशा प्रकारच्या Advertisment मध्ये दाखवले जातात.

**पाटील पुजा सुनिल**
एफ.वाय.बी.एस्सी. कॉम्प्युटर

## आई



आई माझी मायेचा सागर समृद्धीचा घागर।।१।।
।। पिठातली काय असते तिही आई ।।
भाजीतल मिठ
पहिल विद्यापिठ
।। हक्काच व्यासपीठ असते तिही आई ।।
आई माझी मायेचा सागर समृद्धीचा घागर।।२।।
नारळातलं पाणी संतांची अमृतवाणी
।। साऱ्याची ती कहाणी असते तिही आई ।।
आई माझी मायेचा सागर समृद्धीचा घागर ।।३।।
।। पहिला माझा गुरु असते तिही आई ।।
सौख्याचा सागरु
मांगल्याचे सार
अमृताची धार
।। असते तिही आई ।।
आई माझी मायेचा सागर समृद्धीचा घागर।।४।।

**देवयानी जितेंद्र पाचपोळे**
एफ.वाय.बी.ए.

# पारंपारिक जीवनातील स्त्री

पूर्वीच्या काळातील स्त्री मध्ये आणि आताच्या काळातील स्त्री मध्ये खुप अंतर आहे ह्या पारंपारिक काळातील स्त्रीला खुप महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आधीच्या स्त्रीयांपेक्षा आताची स्त्री खुप सक्षम आहे. पूर्वीच्या काळी मुल आणि चूल हीच संकल्पना त्याच्या बाबतीत लागू होती.

पण आजची स्त्री घर संसार सांभाळत–सांभाळत नोकरी सुद्धा अतिशय उत्तम रित्या सांभाळत आहे. घर संसार करीत असतांना तीला खूप भुमिका तीला कराव्या लागत आहे. त्यात कधी आईची कधी–सुनेची तर कधी वहिनीची अशा अनेक भुमिकातून तीला जावे लागत आहे. आईची, सुनेची, वहिनीची भुमिका पार पाडत असतांना ती जितकी शांत वाटत असते.

परंतु जेव्हा घरावर संकट येते तेव्हा घराच्या रक्षणासाठी ती रणरागीनीचा अवतार धारण करीत असते. आपल्या मुलांच्या, आपल्या घराच्या रक्षणासाठी ती साऱ्या जगाशी दोन हात करायला सुद्धा मागे–पुढे पाहात नाही स्त्री ही नोकरी आणि घर संसार अशा दुहेरी गोष्टी अतिशय सुंदररित्या पार पाडत आहे. स्त्री म्हटल म्हणजे प्रेम, ममता, वात्सल्य इत्यादी गोष्ट तीच्यात ठासुन भरलेल्या आहेत.

आधीच्या स्त्रीयांपेक्षा आताची स्त्री दुहेरी–अवस्था पार करते. खुप उंच शिखरावर जाऊन पोहचली आहे. जेव्हा शंकर देवाने आपल्या मुलाची म्हणजेच गणपतीची मान कापून त्याची हत्या त्याने केली. तेव्हा देवी पार्वतीने आपल्या मुलाचे प्राण परत आणण्यासाठी तीने रुद्रअवतार धारण केला होता.

आपल्या मुलांच्या संरक्षणासाठी एक स्त्री काय करु शकते. ही गोष्ट तीने सिद्ध करुन दाखविली पूर्वीच्या काळी स्त्रीला घरातुन बाहेर पडण्याइतक सुद्धा स्वातंत्र्य नव्हत इतकच काय तर मोठ्या माणसांमध्ये किंवा कोणत्याही गोष्टी मध्ये भाग घेण्याचा सुद्धा तीला स्वातंत्र्य नव्हते. पण पूर्वीच्या परिस्थितीपेक्षा आजची परिस्थिती खूप वेगळी आहे. प्रत्येक स्त्री ही प्रत्येक गोष्टीमध्ये भाग घेऊ शकते.

इतकच कशाला वडिलधारी मंडळी सांगतील तीच पूर्व दिशा असे मानू चालायची तीला स्वत:च मत सुद्धा मांडण्याचा तीला अधिकार नव्हता पण आता तस नाही आहे. स्त्रीला स्वतंत्र्य मिळाल्यापासून आजची स्त्री स्वत:च मत सुद्धा मांडु शकत आहे. आजची स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावुन पुढे चालली आहे.

फार पूर्वी पासून स्त्रीला घराची गृहलक्ष्मी असे नाव देण्यात आले आहे. पण पूर्वी तीला तो मान कधीच मिळायचा नाही. पण आता प्रत्येक स्त्रीला तीचा मान मिळत आहे. स्त्रीला गृहलक्ष्मी प्रमाणेच तीला कर्तव्यदक्षीता असे ही नाव देण्यात आले. कारण प्रत्येक स्त्री ही तीची कर्तव्य अतीशय उत्तम रित्या पार पाडत असते. मग त्यामध्ये सुनेची असो आईची असो बायकोची असो नाहीतर मग वहिनी, देराणी, जेठाणी, नणंदची असो कोणत्याच कर्तव्यात ती चुकत नसते. म्हणून कदाचीत तीला कर्तव्यदक्षीता असे नाव देण्यात आले असावे. असे असले तरी स्त्रीयांवर होणारे अन्याय अत्याचार काही थांबता थांबत नाही आहे. घरात सासु–सासरे, नवरा, मुल कोणीही आजारी असेल तर घरातील स्त्री ही रात्रंदिवस त्यांच्या उशाशी बसुन त्यांची काळजी घेत असते. घर आणि संसार ह्या दोन्ही गोष्टी करता करता तीची खूप तारांबळ उडत असते.

स्त्रीयांना नोकरी नंतर घरी आल्यावर सुद्धा घरातील कामे, सासु, सासऱ्यांची काळजी घेणे, नवऱ्याला काय हव काय नको ते पाहाणे मुलांचा अभ्यास घेणे हे सगळे कामे घरातील स्त्रियांलाच करावे लागतात. त्यामुळे विश्रांती म्हणजे काय? हे तिला माहितच नसते. स्त्री घरात किती ही राबराब राबली तरी काही लोकांना तीच्या मेहनतीची,

तिच्या कामाची किंमत नसते.

प्रवासामधुन थकुन भागून आल्यावरही तीला साधा पाणीचा ग्लास पण हातात आणून देत नाही आणि घरातली मोठी स्त्री म्हटली म्हणजे घरातली जबाबदारी तीच्या खांद्यावर येऊन पडते. पूर्वी स्त्रीयांना घरात बोलण्याचा अधिकार नव्हता–त्यामुळे त्याच्या मनातील गोष्ट त्याच्या मनातच ठेवावी लागत असे आणि तेव्हा कायदा सुद्धा स्त्रीयांच्या बाजुने नव्हता त्यामुळे जगण म्हणजे काय हे त्या स्त्रिला माहितीच नव्हते खुप असह्यपणे त्याच जगण होत.

परंतु आजच्या काळात मात्र कायदा सुद्धा स्त्रीयांच्याच बाजुने आहे त्यामुळे स्त्रीया कुठेही बिनधास्त अगदी ताठ मानेने समाजात वावरु शकतात. आजची स्त्री लग्नानंतर सुद्धा शिक्षण घेत आहे. पूर्वीच्या काळी पतीच्या निधना नंतर पत्नीने केस–कापून अलोण नसावे. अशी प्रथा त्या काळी होती आणि बाहेर पण पडु देत नव्हते.

पण आजच्या काळात पतीच्या निधना नंतर सुद्धा पत्नी दुसरा विवाह करुन तीच्या आयुष्याची नव्याने सुरुवात करुन शकते. पूर्वीच्या काळी असलेल्या अंधश्रद्धांना सुद्धा आजच्या काळात काही प्रमाणात आळा बसलेला दिसतो आहे. स्त्री पुरुष या दोघांना समाजात एकच स्थान होते असे पुराणकाळ सांगतो. कालांतराने हुंडा, स्त्रीभृणहत्या, शिक्षणाचा अभाव अशा गोष्टी त्याच्या विकासाला मारक ठरल्या.

पुरुषांकडून स्त्रीयांची छळवणूक सुरु झाली समाजातील पुरुषांचे वर्चस्व वाढले आणि एकेकाळी कुटुंबात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या स्त्रियांचे कुटूंबातील स्थान नगण्य झाले. डिसिजन मेकर म्हणून त्यांचे अस्तित्व संपूष्टात आले सकाळी लवकर उठून घरातील कामे आटोपून मुलांना शाळेत सोडायला जाणे तेथुन ट्रेनने प्रवास करुन नोकरी करणे तेथून दमुन भागून आल्यावर पुन्हा घरातील कामे हेच स्त्रीयांचे जीवन आहे. आजच्या काळात घर सांभाळून नोकरी करणे म्हणजे स्त्रियांसाठी एक प्रकारची तारेवरची कसरतच असते.

म्हणून देवाने कदाचीत स्त्रियांना एवढे सहनशील बनविले असेल. कारण घर आणि संसार सांभाळत नोकरी करण हे फक्त एका स्त्रीलाच जमु शकते. पुरुषांमध्ये तेवढी सहनशीलता नसते. मुलांचा अभ्यास घेण्यापासून ते त्याच्यावर चांगल्या प्रकारचे संस्कार करणे हे एका स्त्रिलाच जमु शकते. आजच्या धावपळीच्या युगात पारंपारिक स्त्रीला शहरी भागातील स्त्रीला विविध क्षेत्र खुली झाली; मात्र ग्रामीण भागातील स्त्री फारशी प्रगती करु शकली नाही. शिक्षणाचा अभाव, आर्थिक दृष्ट्या तिच सक्षम नसणे. पारंपारिक चालीरिती, पुरुषांची अधिकारशाही या गोष्टींमुळे ती जिथल्या तिथे राहिली जो पर्यंत स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम होत नाही, तो पर्यंत ती प्रगती करु शकणार नाही; ग्रामीण भागातील स्त्री ही तीचा पूर्ण वेळ आपल्या कुटूंबीयांना देते तीची एवढीच माफक अपेक्षा असते की त्याच्या कामा विषयी त्यांच कौतुक व्हाव, त्यांच्याशी प्रेमाने दोन शब्द बोलावे या त्या साध्या माफक अपेक्षा त्यांच्या असतात. पण खरच आपण त्याची ही माफक अपेक्षा पूर्ण करतो का ? त्याच्या श्रमाचा मोल कुटूंबीयांना असत का ? शाब्दिक का होईना, पण कौतुकाचे चार शब्द त्यांना ऐकायला मिळतात का ? कौतुकाच्या या चार शब्दांनी त्याच्या कामाचा उत्साह दुणावत असेल का ? पूर्ण वेळ गृहीणी असलेल्या स्त्रियांना अपेक्षित मान मिळतो का ? या मानासाठीच तर त्या आसुसलेल्या नाहीत ना ? त्याच्या आर्थिक स्वातंत्र्याच काय? त्यांना स्वत:च्या इच्छे नुसार खर्च करायची परवानगी आहे ? त्यांना तो करता येतो ? की तो करता येण्यासाठी त्यांना कामाचा मोबदला मिळायला हवा?

अशा अनेक प्रश्नांची उत्तर शोधण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे ते थेट मुंबईतल्या गृहीणींनाच विचारुन या सर्वेक्षणातुन मिळालेली उत्तरे म्हणजे आपल्या समाजातल्या पारंपारिक स्त्री मानसिकतेचा आरसा म्हणावा लागेल.

स्त्रीवाद म्हणजे लिंगभेद झुगारुन स्त्री–पुरुष समानतेकडे वाटचाल करणारा विचार प्रचार समाजात जरी स्त्रीवाद ही पुरुषविरोधी चळवळ समजली जाते. त्यामुळे ही स्त्रीयांचे ऐतिहासिक दुय्यमत्व उजेडात आणून हे शोषण संपविण्याचा प्रयत्न करते. ही एक सामाजिक, राजकीय जाणीव आहे. स्त्रीवाद ही संकल्पना जरी पाश्चात्य आधुनिकतेत

उदयास आली अशी सामान्य समजुत असली तरी ही जाणीव त्यापूर्वीही वेगवेगळ्या कालखंडात आणि ठिकाणी आढळुन आलेली दिसते. म्हणूनच एकच स्त्रीवाद नसून अनेक स्त्रीवाद दिसून आले आहेत व येतात.

सार्वजनिक जिवनात स्थाना, ामन आणि संधी तर नाहीच, पण पदार्पणाची परवानगीही नाही नव्या महाराष्ट्राच्या जडणघडणीत स्त्रियांचे योगदान अनेक प्रकारचे आहे आणि फार मोलाचे असे आहे. स्त्रीच्या अवनतीचा हा काळ काही फार दुरचा नव्हे अवघा दीड–दोनशे वर्षापूर्वीचा आहे. अगदी लहानशा अशा पुढचा कालखंडात आश्चर्यकारक प्रगतीचा टप्पा स्त्रीने गाठला आहे स्त्रीच्या कर्तबगारीचे महत्त्व आणि स्त्रियांचे योगदान अनेक पातळ्यांनवरचे आहे. अत्यंत प्रतिकूल अशा सामाजिक, कौटुंबिक परिस्थितीला न जुमानता कधी संघर्ष तर कवी समन्वय करीत ज्या स्त्रियांनी विकासाच्या वाटा खुल्या करण्याचा ध्यास घेतला, त्यांच्यामुळेच आज एकविसाव्या शतकातल्या स्त्रियांना राजमार्गावरुन चालता येत आहे. त्यांचे धैर्य, त्यांचे शहाणपण, त्यांचा, निश्चिय, त्यांचे कर्तृत्व आणि त्यांची तळमळ या सर्व गोष्टींचे स्त्रीधन आधुनिक स्त्रीला परंपरने मिळाले आहे.

स्त्रियांचे योगदान हे फार मोठे ठरले आहे. शिक्षणाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली असे आपण मानतो. सार्वजनिक जीवनात सर्व क्षेत्रामध्ये आत्मविश्वासाने आणि हिरिरीने पुढे सरसावलेल्या कर्तृत्ववान स्त्रियांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक विकासाला जसा हातभार लावला तसाच सांस्कृतिक विकासालाही लावला आहे.

**वैष्णवी महाजन**
एफ.वाय.बी.ए.

---

## आयुष्य

आयुष्याच्या वाटेवर चालत असतांना
समस्या सोडवायच्या असतात.
समस्या सोडवून आनंद मिळवायचा असतो
आयुष्य हे असेच असते.

सर्वाचा विचार करावा लागतो,
सर्वाची सोबत मिळवायची असते.
सर्व मना प्रमाणे होण्याची इच्छा असते.
आयुष्य हे असेच असते.

सर्व कर्तव्य पार पाडायची असतात
सर्व परंपरा बाळगायच्या असतात
संस्कृती टिकवायची असते
आयुष्य हे असेच असते

सुख दु:ख हे येतच असतात
नशिब बदलत असते
एक दिवस हे सगळं सोडायचे असते.
आयुष्य हे असेच असते.

**पाटील माधुरी नारायण**
एस.वाय.बी.ए.



## जिवन काय आहे ?

जिवन एक रंग आहे
तो आपल्या आयुष्यात भरा
जिवन एक फुल आहे
ते फुलवा
जिवन एक पुस्तक आहे
ते उघडून वाचा
जिवन एक झाड आहे
त्याला वाढवा
जिवन एक गणित आहे
ते सोडवा
जिवन एक वहाती नदी आहे
तिला सागराचा मार्ग दाखवा
जिवन एक स्पर्धा आहे
ति जिंका
जिवन एक स्वप्न आहे
त्याला पूर्ण करा
जिवन एक गीत आहे
ते गात रहा
जिवन एक परीक्षा आहे
त्यात पास व्हा
जिवन एक संधी आहे
ति स्विकारा
जिवन एक खेळ आहे
तो हसत हसत खेळा

**मोहिनी सुधिर पाटील**
एफ.वाय.बी.एस्सी.

## मैत्री

मैत्री करणे सोपे, टिकवणे कठीण
जर विचार जुळले, तर तेही होते सोपे
मित्र मैत्रीणी सर्वांना असतात,
चांगले काही, वाईट काही,
पण आत्मसात करा चांगल्यांचे विचार,
वाईटांचे नाही
आनंदातली सोबत असते कामापुरती
दु:खातली सोबत असते आयुष्यभराची
नेहमी करा चांगल्यांशी संगत
तुमच्या आयुष्यात येईल रंगत
मिळते खरी सोबत, मग वेळ जातो रमत गमत।।

**कु. महाजन नेहा राजेंद्र**
एस.वाय.बी.ए.

## शिक्षक

शिक्षक आहे असा एक कल्पवृक्ष की,
ज्याखाली उभे राहुन होतात
सर्व मनोकामना पूर्ण.....
शिक्षकांनी दाखविलेलेच मार्ग
करतात जीवनाचे सार्थक......
ज्याप्रमाणे परिसात आहे सामर्थ्य,
लोखंडाचे सोने करण्याचे,
त्याचप्रमाणे शिक्षकांत आहे सामर्थ्य
विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्याचे.....
शिक्षकांसारखा नसतो योगी पुरुष
कोणी दुसरा या जगी.........
जणु त्याचा जन्म झाला
दुसऱ्याचे सार्थक करण्यासाठी.....
म्हणून वाटते माझ्या मना
शिक्षक आहे असा एक कल्पवृक्ष की,
ज्याखाली उभे राहुन होतात
सर्व मनोकामना पूर्ण......

**कु. महाजन नेहा राजेंद्र**
एस.वाय.बी.ए.

# यशस्वी जीवनासाठी

आजच्या स्पर्धेच्या युगात, माहिति तंत्रज्ञानाच्या युगात आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे पडत आहे. तरीसुद्धा काही तरुण जिद्दीने, महेनतीने, ध्येयप्रेरीत होऊन आजच्या युगात आपले ध्येय साध्य करण्यासाठी धडपडत आहेत. विद्यार्थी व तरुणांनी कुठल्याही प्रकारच्या अडथळ्यांचा विचार न करता आपले ध्येय साध्य करणे आवश्यक असते. त्यासाठी सकारात्मक विचार मनात ठेवुन तरुणांनी आपले कार्य साध्य करणे आवश्यक आहे. शिक्षण घेण्याच्या वयातच आपण जास्तीत जास्त उच्च शिक्षित होऊन सुसंस्कृत कसे होता येईल याचा विचार करायला हवा. आपल्या परीसरातील तसेच समाजातील अनेक मोठ्या व्यक्ती ह्या आपली घरची परिस्थिति फारशी चांगली नसतांनाही चांगल्या प्रकारे उच्च पदस्थ आहेत व समाजामध्ये चांगले सामाजिक कार्य करीत आहेत. त्यामुळे परिस्थितीचा, अडथळ्यांचा विचार करत बसण्यापेक्षा त्यातुन मार्ग काढुन तरुणांनी आपले ध्येय साध्य केले पाहिजे.

आई वडिलांचे उत्तम संस्कार, गुरुचं योग्य मार्गदर्शन, आपण केलेले अथक परिश्रम व आईवडील, गुरु जे सांगतात त्यावर विश्वास ठेवल्याने यश आपल्याकडे धावुन येते. जगामध्ये चांगल्या, वाईट गोष्टी असतात. सुष्ट दृष्ट माणसं असतात. पण आपण आपलं भान ठेवणं महत्त्वाचं असतं वाईटाचा त्याग करुन वाईटावर मात करुन चांगल्याचा स्वीकार केला पाहीजे. अनेक वाईट गोष्टींना तोंड देत पुन्हा पुन्हा उभं राहणं महत्वाचं आहे, खचुन जाऊ नये. भरपुर कष्ट, स्पष्ट विचार व कसुन अभ्यास केल्याने मनुष्य यशस्वी होतो. चांगल्या मनाने, विचारानं आणि वृत्तीने यशस्वी होतो.

माणसातलं परिवर्तन करण्यासाठी शिक्षण (ज्ञान) हा चांगला पर्याय आहे. बहुतेकांना का शिकायचे ? हेच कळत नाही. आई वडीलांनी शाळेत घातले म्हणुन शिकावं लागते. परंतु ज्ञान मिळविण्यासाठी शिकायचे असते. ज्ञानाचा उपयोग व्यवहारात केला पाहीजे जेणे करुन समाजोपयोगी कार्य आपल्या हातुन घडेल. ज्ञानाने बुद्धीचा विकास होतो, सुसंस्कृतपणा येतो, विचार सुधारतात. चांगले विचार मनात आले की, आचरण चांगले होते. हेच विचार आपल्याला आपले जवीन यशस्वी बनविण्यासाठी उपयोगी पडतात.

शिक्षण घेणे म्हणजे नोकरी मिळविण्याचे साधन नव्हे तर जीवनात आपण कुठल्याही परिस्थितीत सामोरे जाता यावे, आलेल्या संकटांना समर्थपणे तोंड देता येणे, खचुन न जाता संकटाचं ध्येर्याने संकटाचं निवारण करणं. आज अनेक क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा, कौशल्याचा उपयोग करुन विविध क्षेत्रात आपण आपल्या कार्याचा ठसा उमटवू शकतो. आपल्या कार्यशैलीची झलक दाखवून दैदीप्यमान यश मिळवू शकतो. फक्त पाहिजे डोळ्यासमोर आदर्श विचार, ध्येय व ते साध्य करण्यासाठी अथक परिश्रम, धडपड करण्याची गरज आहे.

**❊ मी देवाला विचारले ❊**

''मनुष्या विषयी जास्त आश्चर्य का वाटते?''

**देव :** मनुष्य पैसा मिळविण्यासाठी आरोग्य गमावतो व आरोग्य परत मिळविण्यासाठी तो सर्व पैसा खर्च करतो. तो भविष्याच्या काळजीत वर्तमान गमावतो, त्यामुळे तो वर्तमानातही जगत नाही व भविष्यातही जगत नाही. तो असा जगतो की, कधीच मरणार नाही, आणि असा मरतो की, कधीच जगलाच नाही.

**कु. नेहा राजेंद्र महाजन**
एस.वाय.बी.ए.

## एक मुलगी

मुलगी आई–वडिलांची लाडकी असते
त्यांना तीला कधिही सोडायचे नसते.
पण त्यांच्यावर ही परिस्थिती येतेच.
आणि तिला आई–वडिल सोडावेच लागते.
मुलगी दोन घरांना जोडते.
आणि नाते संबंध निभावते.
कधि ही दुसऱ्यांचा विचार करते
स्वत:साठी कधिच जगत नसते.
मुलगी सर्वांना सावरते
प्रत्येक वेळी कर्तव्य पार पाडते.
सर्वांना आनंद देते
सर्वांचे दु:ख हिरावुन घेते
सर्वांना एकत्र करते
सर्वांना आपुलकी देते
सर्वांचे दु:ख पुर करते
ती एक मुलगीच असते !

**पाटील माधुरी नारायण**
एस.वाय.बी.ए.

## का कळत नाही

का कळत नाही
पण आईची माया सगळ्यांना दिसते
पण बाबांचे प्रेम दिसत नाही
मुलांना सगळ्या सोई–सुविधा दिसतात
पण बाबांचे कष्ट दिसत नाही.
मुल स्वप्नांच्या दिशेने धावतात.
त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी बाबा
रात्र–रात्र जागतात.
सगळ्यांच्या गरजा पूर्ण करता करता
ते स्वत:ला विसरतात.
जेव्हा मुलीच लग्न होत तेव्हा
आदर, अतिथ्य करतांना त्याचे हाथ थकतात.
शेवटी ते बाबांचा काळजाचा तूकडा
घेऊन जातात
माझे बाबा माझ्यासाठी देवाच्याही आधी असतात !

**गायत्री प्रभाकर महाजन**
एस.वाय.बी.ए.

## मन

मन हे असते कोवळे
त्याला शब्दांचा मार
कोणी काही बोलुन गेले
पडतो त्याच्यावर भार

जेव्हा–जेव्हा होतो त्याला हर्ष
तेव्हा–तेव्हा भावना करतात स्पर्श

आवडतो त्याला आपल्यांचा सहवास
त्यातच त्याला अनेकांचा त्रास

मने हे असतेच आजाद
त्याच्यावर नसते कुणाचे राज

**साक्षी चंपालाल महाजन**
एफ.वाय.बी.ए.

## मुलींचं जीवन

जिच्या जीवनाचा प्रवास
संघर्षाने सुरु होतो
ती मुलगी असते !
जन्माला येताच जी
सगळ्यांना नकोशी वाटते
ती मुलगी असते !
सुखाच्या वाटेकरी असतांना
तिरस्काराचे जीवन मिळते
ती मुलगी असते !
जी आपल्या पायगुणाने लक्ष्मी
आणि वाणीतून सरस्वती आणते
ती मुलगी असते !
जी कितीही हुशार असली
तरी तिला मुलांपेक्षा कमी लेखल जात
ती मुलगी असते !
जी आपल्या भावनांचा अंत करुन
सगळ्यांच्या भावनांचा विचार करते
ती मुलगी असते !
आईच मन जाणणारी आणि
वडीलांचा मान जपणारी
ती मुलगी असते !
मुलगा जरी वंशाचा दिवा असेल
तर ती वंशाची समई बनते
ती मुलगी असते !
पण सगळ्यांना जी नको असते
ती मुलगी असते !!!

**गायत्री प्रभाकर महाजन**
एस.वाय.बी.ए.

## प्रेम

जी व्यक्ती कितीही भांडण करुन
तुम्हाला मनवायची क्षमता ठेवते
समजुन जा कि तीच व्यक्ती
तुमच्यापेक्षा तुमच्यावर जीवापाड
प्रेम करते......



## गणित माझ्या जीवनाचे

जीवन माझे शुन्य होते
त्यात तु बेरीज म्हणुन आली
त्यात फक्त मुलांचा भागाकार होऊ दे
आणि ठरलेले जीवन बरोबरीच्या
खुनेप्रमाणे सरळ चालु दे

संकलन - **अंकुश सुभाष कोजगे**
एस.वाय.बी.ए.

# स्त्री-भ्रुणहत्या

**मुलांपेक्षा मुलगी बरी प्रकाश देई दोन्ही घरी**

स्त्री भ्रुणहत्या ही समाजाला लागलेली एक कीड आहे असे म्हटले तरी ते काही चुकीचे ठरणार नाही. एकेकाळी डॉक्टर नसल्यामुळे भोंदूबाबाच्या चक्रत अडलेला तो म्हणजे प्राचीन काळ होता. पूर्वीच्या काळा मध्ये डॉक्टर नव्हते त्यामुळे सोनोग्राफी वैगरे असले प्रकार त्याकाळात नव्हते म्हणून एखाद्या भोंदूबाबाकडे जावून मुलगा आहे की मुलगी हे बघीतले जात असे आणि त्या बाबानी जर सांगितले की पोटात मुलगी आहे तर मारुन फेकले जात असे एखाद्या बाबाने सांगुन आपल्या बाळाचा जीव घेणे कितपत योग्य आहे. इतकच काय तर पूर्वी बाल विवाह ही होत असत आणि पतिच्या निधना नंतर त्या मुलीचे जे काही हाल, अन्याय, अत्याचार होत असे ते पाहुन जिव तिळतिळ तुटत असे त्यानंतर काळ बदलत गेला. काळ बदलला पण माणूस मात्र तोच आहे माणूस नाही बदलला आजच्या काळात हीच भीषण परिस्थिती आहे आज ही हजारो मुली मारल्या जात आहे. त्यामुळे मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या कमी होत आहे. हे कुठेतरी थांबायला हवे हे जर असेच अजून काही काळ सुरु राहिले तर मुलीचे नामोनिशानही दिसणार नाही. आज मुलींची संख्या झपाट्याने कमी होत आहे. ह्याला जबाबदार आहे. तो आपला हा समाज जो मुलांच्या तुलनेत मुलींना नेहमीच तुच्छ समजत आला आहे. ही किती लाजीर वाणी गोष्ट आहे आपण सगळेच म्हणतो की काळ बदलला आहे. पण काळ खरच बदलला आहे का ? आपण हे सुद्धा नेहमीच म्हणतो काळानुसार माणूस बदलतो हे जरी खरे असले तरी माणसाचे विचार कधी बदलणार सांगाना फक्त माणूस बदलुन चालत नाही तर त्याच बरोबर माणसाचे विचार सुद्धा बदलायला हवे तरच ह्या देशाची, जगाची प्रगती होईल. जगाची आणि देशाची प्रगती करायची असेल तर आधी आपल्याला बदलायला हवे एखाद्या मुलीच जेव्हा लग्न होत तेव्हा आशिर्वाद देतांना तीला अष्टपुत्र सौभाग्यवती भव असा आशिर्वाद दिला जातो. परंतु अष्टपुत्रा ऐवजी इष्टपुत्रभव असा आशिर्वाद का ? नाही दिला जात माझ्यामते आजच्या मुलीने आजच्या मुलांना प्रत्येक क्षेत्रात मागे टाकले आहे. प्रत्येक क्षेत्रात मुलांपेक्षा मुलींचे राज्य दिसून येते आहे. एवढ सगळ असतांना मुलगा हवा मुलगी नको हा अट्टाहास का? मुलगा वंशाचा दिवा असतो. म्हणून की मुलगा म्हातारपणाची काठी असतो. म्हणून मग जर मुलगा वंशाचा दिवा होऊ शकतो तर मग का? नाही होऊ शकत मुलगी ही वंशाची पणती हो शकते आणि म्हातारपणाची काठी सुद्धा होऊ शकते. आज आपण किती तरी उदाहरणे बघतो. की मुलांपेक्षा मुलींनेच म्हातारपणात आईवडिलांना आधार दिला. ज्या लोकांना मुलगी पेक्षा मुलगा हवा असतो. ती लोक एक गोष्ट विसरतात की त्यांनी सुद्धा एका स्त्रीच्या गर्भातुनच जन्म घेतला आहे. आज जर ती स्त्री नसती तर आपण हे जग बघु शकलो नसतो. ही गोष्ट मात्र पूर्णपणे विसरतात. आपण बाहेरगावी जात असतांना आपण अनेक ठिकाणी बोर्ड वाचत असतो. सुखी संसाराचे सुत्र मुलीलाच माना पुत्र, मुलगी शिकली प्रगती झाली असे बोर्ड आपण बघत असतो, वाचत असतो. पण आपण हे फक्त बघतो/वाचतो. पण आपण कधी त्या प्रमाणे वागतो का? हे फक्त वाचून किंवा बघुन काही उपयोग नाही, तसे आपण वागायला पण हवे जेव्हा दुसरे लोक एखादी चूक करतात तेव्हा आपण त्यांना आपण समजावतो ती चूक करण्यापासून आपण त्यांना प्रवृत्त करतो. पण ती लोकांनी ऐकल नाही तर आपण त्यांना नरकाची भिती घालतो पण स्त्रीभृण हत्या करुन आपण सुद्धा तीच चुक करत असतो पण ही गोष्ट आपल्या लक्षात सुद्धा येत नाही. मुले ही देवा घरची फुले अस आपण म्हणतात मग त्याच मुलांना मारुन आपण देवाचा दोष स्वत: ओढुन घेत असतो. त्या लहान निरागस मुलीचा नेमका अपराध तरी काय ती मुलगी म्हणून

www.sites.google.com/site/svpcalibrary हे ग्रंथालयाचे संकेतस्थळ आहे. यावरील माहितीचा, ज्ञानसाहित्याचा वाचकांना अभ्यासासाठी, नोकरीविषयक जाहिराती, महत्वपूर्ण संकेतस्थळ शोधण्यासाठी फायदा होतो.

**⁎ N-List Service :–**

INFLIBENT, अहमदाबाद यांच्यामार्फत वाचकांना N-List सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यामध्ये वाचकांना ९७,००० ई–पुस्तके आणि ६००० पेक्षा जास्त ई–मासिके ऑनलाईन बघता येतात. तसेच जतन करता येतात. महाविद्यालयातील प्रत्येक प्राध्यापकांचा N-List वर नोंदणी असून वेळोवेळी वापराबद्दल मार्गदर्शन केले जाते. महाविद्यालयातील प्रत्येक पदवुत्तर विद्यार्थ्यांना N-List वर नोंदणी करणे बंधनकारक असून त्यांची नोंदणी करुन त्यांना N-List वापराचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**⁎ Social Networking माध्यमाचा उपयोग :–**

महाविद्यालयीन युवक Social Networking माध्यमाचा उपयोग प्रभावीपणे करत आहेत. हे लक्षात घेता, ग्रंथालयाचे svpcalibrary हे फेसबुक पेज तयार करण्यात आले आहे. यावरुन वाचकांना ग्रंथालयात आलेली नवीन पुस्तके, सूचना, रोजगार विषयक तसेच इतर ज्ञानवृद्ध करणारी माहिती पुरविण्यात येते.

**⁎ E-mail Service :–**

वाचकांना ई–मेल सेवा देण्यात येते. यामध्ये ज्ञानवृध्दीपुरक, चर्चासत्रे, शासननिर्णय, अभ्यास विषयक माहिती दिल्या जाते.

**⁎ Print/Reprography Service (Zerox) :–**

महाविद्यालयातील सर्व वाचकांना तसेच बाह्यगत वाचकांसाठी ना नफा–ना तोटा या तत्वानुसार एक रुपया दराने Print/Reprography सेवा देण्यात येते. या अंतर्गत एकूण ७२३९ प्रति झेरॉक्स सुविधा देण्यात आली. या एकूण झेरॉक्स पैकी महाविद्यालयाच्या ४९३९, विद्यार्थ्यांच्या २३००, प्रति झेरॉक्स सुविधेचा लाभ देण्यात आला.

**⁎ New Arrivals ची सुविधा :–**

ग्रंथालयात प्रत्येक महिन्याला ग्रंथ खरेदी करण्यात येते. या सर्व ग्रंथांची यादी सूचना फलकावर लावण्यात येते. तसेच नवीन आलेल्या ग्रंथांना फेसबुक, ब्लॉग आणि ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात येते. यामुळे वाचकांना ग्रंथालयात आलेल्या नवीन ग्रंथांची माहिती होते.

**⁎ उत्कृष्ट ग्रंथालय वाचक पुरस्कार :–**

ग्रंथालयामार्फत दरवर्षी 'उत्कृष्ट ग्रंथालय वाचक पुरस्कार' दिला जातो. यामध्ये वाचकाची ग्रंथालयातील हजेरी, वर्तणुक, इंटरनेट, ग्रंथ मासिके यांचा वापर या निकषावरुन ग्रंथालय सल्लागार समिती या पुरस्काराची निवड करते. शैक्षणिक वर्ष २०१९–२० चा हा पुरस्कार कु. श्वेता पांडुरंग महाजन या तृतीय वर्ष विज्ञान वर्गाच्या विद्यार्थीनीला देण्यात आला.

**⁎ स्पर्धा परीक्षा कट्टा (Competitive Exam Guidance) :–**

ग्रंथालयात नोकरीविषयक जाहिरातीसाठी स्वतंत्र्य सूचनाफलक आहे. यासुचनाफलकावर रोजगार, नोकरीविषयक जाहिरातींचे कात्रणे लावण्यात येतात. याचा वाचकांना रोजगार, नोकरीविषयक संधी शोधण्यासाठी फायदा होतो. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षाबद्दल वेळोवेळी माहिती उपलब्ध व्हावी व त्यांना भविष्यात स्पर्धा परीक्षेबद्दल गोडी निर्माण व्हावे ह्या उद्देशाने ग्रंथालयाने 'स्पर्धा परीक्षा कट्टा' हा उपक्रम सुरु केला यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

* External Membership **ची सुविधा :–**

महाविद्यालयीन वाचकांप्रमाणेच इतर वाचकांना ग्रंथालयातील सेवा देण्यासाठी External Membership ची सुविधा आहे. या वाचकांना ग्रंथालय नियमांनुसार सर्व सेवा देण्यात येतात.

* ग्रंथ/मासिके बांधणी :–

ग्रंथालयात दरवर्षी जीर्ण, फाटलेल्या ग्रंथाची तसेच मासिके/नियतकालिके यांची बांधणी केली जाते. व ते वाचकांना अभ्यासासाठी उपलब्ध करुन दिले जातात.

* Newspaper Clipping Service :–

रोजगार विषयक जाहिराती, महाविद्यालयात होणाऱ्या विविध घडामोडी विषयी वर्तमानपत्रामध्ये आलेली माहिती जतन करण्यात येते.

* **प्राथमिक उपचार सुविधा** (First Aid Facility) :–

ग्रंथालयामध्ये किरकोळ दुखापत दुरुस्तीसाठी प्राथमिक उपचार सुविधा देण्यात येते.

* **जुन्या प्रश्नपत्रिका पुरवण्याची सुविधा** (Old Question Papers Facility) :–

ग्रंथालयात वाचकांना सर्व वर्गांच्या जुन्या प्रश्नपत्रिका पुरवण्यात येतात. याचा वाचकांना परीक्षेच्या तयारीसाठी मदत होते.

* **ग्रंथालय प्रतिसाद २०१९–२०** (Library Feedback - 2019-20) :–

ग्रंथालयाचे सभासद असलेल्या वाचकांकडून दरवर्षी Feedback घेतला जातो. त्यामधून वाचकांच्या ग्रंथालयाविषयी काही मागण्या, तक्रारी, सूचना असल्यास त्या सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. शैक्षणिक वर्ष २०१९–२० या वर्षांचा ग्रंथालय वाचक प्रतिसाद दिनांक २३–०४–२०२० ते ३०–०४–२०२० या दरम्यान घेण्यात आला. यास एकूण ११० वाचकांनी प्रतिसाद दिला. सदर प्रतिसाद Google Form च्या माध्यमाने नोंदविण्यात आला. प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण करुन त्यानुसार ग्रंथालय समितीच्या आगामी बैठकीत योग्य त्यापुढील कार्यवाही साठी ठेवण्यात येईल.

**प्रा.एस.एस. साळुंके**
ग्रंथपाल
स.व.प. कला आणि विज्ञान महाविद्यालय,
ऐनपूर, ता.रावेर, जि.जळगांव

# विद्यार्थी विकास मंडळ वार्षिक अहवाल
# शैक्षणिक वर्ष - २०१९-२०

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर, ता. रावेर,जि.जळगाव आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली या महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक विकासाबरोबर सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक, व्यक्तिमत्व विकास आणि राष्ट्रासाठी सुद्दढ, सर्वगुण संपन्न युवा पिढी निर्माण करणे हा उद्देश आहे. त्यासाठी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे मा.संचालक प्रा.सत्यजित साळवे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयात चालू शैक्षणिक वर्षात विविध शिबीरे, कार्यशाळा, थोर महापुरुषांच्या जयंती–पुण्यतिथी साजरे करण्यात आलेले आहे. तसेच केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांच्या आदेशान्वये विविध योजना, कार्यक्रमाची आमच्या महाविद्यालयात मा.प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास मंडळाकडून अंमलबजावणी करण्यास पुरेपूर प्रयत्न झालेला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग महत्वपूर्ण होता. त्यांचा सहभाग अधिकाधिक वाढवा यासाठी वेळोवेळी वर्गात सूचना फिरवणे, नोटीस बोर्डावर जाहीर सूचना लावणे, प्रत्यक्ष वर्गात जावून सूचना–मार्गदर्शन, प्रोत्साहन करणे इत्यादी कार्य आवर्जुन करण्यात आले.

**त्यातील काही महत्वपूर्ण कार्यक्रमाची व योजनांची आढावा–अहवाल पुढील प्रमाणे :–**

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना
२) आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना
३) विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजना
४) वैदयकीय तपासणी शिबीर
५) राज्यशासन खुली शिष्यवृत्ती योजन
६) छत्रपती राजर्षी शाहूमहाराज शिष्यवृत्ती
७) युवारंग युवक महोत्सव
८) रॅगिंग प्रतिबंधक/कार्यशाळा – समिती/कार्यशाळा
९) विविध कार्यशाळा व शिबीरे
१०) मतदार जनजागृती कार्यशाळा
११) विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा
१२) स्वयंसिध्दा अभियान
१३) स्नेहसंमेलन

**अशाप्रकारे राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाची योजनांची, शासकीय उपक्रमाची माहिती विवरण थोडक्यात खालील प्रमाणे –**

**१)** शैक्षणिक वर्ष २०१९–२० या वर्षासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी विकास मंडळ सल्लागार समिती गठण करण्यात आले. यामध्ये विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.एस.पी.उमरीवाड व

युवतीसभा प्रमुख प्रा. डॉ. रेखा पी. पाटील तसेच सदस्य म्हणून प्रा.डॉ.पी.आर महाजन, प्रा.डॉ.आर.व्ही.भोळे, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.व्ही.एच.पाटील, प्रा.डॉ.जे.पी. नेहेत, प्रा.व्ही.एन.रामटेके यांची निवड करण्यात आली. सदर समितीमार्फत वर्षभरात राबविण्यात येणार असलेलया कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यात येऊन त्याच्या अंमलबजावणीची रुपरेषा निश्चीत करण्यात आले.

**२) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना :–**

या योजनेनुसार गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणखर्चाचा काही हिस्ता आपल्या मेहनतीतून भागवता यावे, शिक्षणाबरोबर श्रममूल्य–श्रमसंस्काराची जाणीव विद्यार्थी दशेपासून व्हावी हा हेतू आहे. विद्यापीठाच्या मान्यतेनुसार विद्यार्थी संख्येच्या आधारावर सात विद्यार्थ्यांची निवड विद्यार्थी विकास मंडळामार्फत करण्यात आले. यामध्ये – १) राजपूत शांताराम गोकुळसिंग (एम.ए. अर्थशास्त्र), २) पाटील राजेश रमेश (टी.वाय.बी.एस्सी.), ३) महाजन अक्षय रामदास (टी.वाय.बी.एस्सी.), ४) तायडे अश्विनी किशोर (एस.वाय.बी.एस्सी.), ५) पाचपोळे दिव्यानी जितेंद्र (एफ.वाय.बी.ए.), ६) चौधरी विद्या गणेश (एफ.वाय.बी.ए.), ७) व्याघ्राम्बरे स्नेहल संजय (एफ.वाय.बी.ए.) या विद्यार्थ्यांच्या निवड यादीला विद्यापीठाची मान्यता मिळाली. वर्षभरात महाविद्यालयातील परिसरातील गवत काढणे, झाडांना आळे करणे, पाणी देणे, ग्रंथालयात पुस्तके रचणे, शिक्के मारणे, कॉम्प्युटर ऑपरेटिंग, कार्यालयीन–ग्रंथालयीन सयाय्यभूत कामे या विद्यार्थ्यांनी दैनंदिन तासिका संपल्यानंतर केलेले आहे. त्यांच्या सहभागानुसार मानधन देण्यात आले. याचा फायदा विद्यार्थ्यांना झाला आहे.

**३)** शासकीय आदेशान्वये विद्यापिठाच्या निर्देशानसुार महाविद्यालयात रॅगींग प्रतिबंध समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने तर सचिव पदी प्रा.डॉ.पी.आर.महाजन होते. प्रा.डॉ.के.जी.कोल्हे, प्रा.डॉ.रेखा पी.पाटील, प्रा.एम.के.सोनवणे, डॉ.नीता वाणी,प्रा.डॉ.पी.आर.गवळी आणि प्रा.डॉ.डी.बी.पाटील व प्रा.एस.पी.उमरीवाड हे सदस्य पदी होते.

**४)** विद्यापिठाच्या निर्देशानुसार विद्यार्थी अपघात सुरक्षा विमा योजना आणि दरवर्षाप्रमाणे प्रथम वर्ष बी.ए.व बी.एस्सी वर्गातील विद्यार्थ्यांची आरोग्य (वैद्यकीय) तपासणी दि. ०३/०९/२०१९ रोजी करण्यात आली यासाठी ऐनूपर येथील डॉ.आर.एल.पाटील, डॉ.सचिन पाटील, डॉ.संदीप चौधरी (विटवा), व ऐनपूर येथिल प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.डी.महाजन आणि महाविद्यालयाचे प्रा.डॉ.पी.आर.महाजन, प्रा.डॉ.आर.व्ही.भोळे, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.व्ही.एन.रामटेके, प्रा.व्ही.एच.पाटील यांचे या कामी अनमोल सहकार्य लाभले.

**५) विविध कार्यशाळा / चर्चासत्र / परिसंवाद / कार्यक्रम :–**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, विद्यार्थी विकास विभाग व सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐपनूर यांच्या संयुक्त विद्यायमाने दि.२०/०९/२०१९ रोजी एकदिवशीय रँगिंग प्रतिबंधक समुपदेशन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी रावेर, फैजपूर, भालोद, यावल, मुक्ताईनगर, भुसावळ, जळगाव इत्यादी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक या कार्यशाळेत सहभागी झाले होते. या कार्यशाळेमध्ये एकूण १३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

तसेच म. गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने शासनाच्या निर्देशाधीन म्हणून महाविद्यालयाने घोषित केले. आणि दि. २४/०९/२०१९ रोजी 'स्वच्छता ही सेवा' या कृतीरुप कार्यक्रमाचे आयोजन करुन एक हप्ता

स्वच्छता मोहिम राबविण्यात आले. त्याच बरोबर वरील औचित्याने दि. ०१/१०/२०१९ रोजी अंतर्गत या कृतीरुप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. २६ नोव्हेंबर २०१९ हा दिवशी 'संविधान दिवस' साजरा करण्यात आला. 'राष्ट्रीय समरसता दिवस' या निमित्ताने महाविद्यालयात विविध कार्यक्रम घेण्यात आले.

दि. १९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०१९ हा सप्ताह 'कौमी एकता सप्ताह' साजरा करण्यात आला.

विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये २०१९-२० या शैक्षणिक वर्षात 'विद्यार्थी (मुले/मुली) व्यक्तिमत्व विकास' कार्यशाळेअंतर्गत दहा व्याख्यानांचे कार्यक्रम घेण्यात आले. परिसरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या कार्यक्रमांचा लाभ घेतला. व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परीक्षा, भाषण-संभाषण, सुत्रसंचालन, कौशल्य, ताण-तणाव मुक्त परीक्षा, जातीय सलोखा, राष्ट्रीय एकता व एकात्मता, सोशल मिडीया, लिंग समभाव, बेटी बचाओ-बेटी पढ़ाओ, रोजगाराच्या संधी कशा शोधाव्यात ? असे विविध विषयांवर व्याख्यान घेण्यात आले.

* विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन दि. ०७ जानेवारी २०२० रोजी करण्यात आले. त्यात प्राचार्य डॉ. अरुणाताई शिरीष चौधरी यांनी महिलांचे आरोग्य, प्रा.डॉ. किर्ती उबाळे यांनी 'मी स्वंय सिध्दा' ॲड. विद्या सोनार यांनी 'महिला विषयक कायदे' आणि प्रा.डॉ. सविता वाघमारे यांनी 'महिलांचे समाजव्यवस्थेतील स्थान' या विषयावर व्याख्याने दिले. या कार्यक्रमात १२२ विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला.

* युवती सभा अंतर्गत दि. १६ जानेवारी ते २४ जानेवारी २०२० या कालावधित स्वयंसिध्दा अभियान घेण्यात आले. त्या अंतर्गत विद्यार्थीनींना कराटे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षक म्हणून राजेंद्र सुरवाडे, गणेश जलंकार आणि वसीम तडवी यांनी मेहनत घेतली. महाविद्यालयातील ६४ विद्यार्थीनींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

* दि. २५ जानेवारी २०२० रोजी 'राष्ट्रीय मतदार व मतदान' दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात विविध स्पर्धा घेण्यात आले. वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आले. मतदार म्हणून सद्सदविवेक बुध्दीचा वापर करुन कोणत्याही अमिषाला बळी न पडता मतदान करण्याचे शपथ घेण्यात आले.

**६) आर्थिक दुर्बल घटक योजना :-**

आर्थिक दुर्बल घटक योजनेंतर्गत चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्य योजनेमध्ये महाविद्यालयामार्फत १३ विद्यार्थ्यांची शिफारस करण्यात आलेली होती. त्यात अनु:जाती, अनु:जमाती, विजाभ, विमाप्र, इमाव या मधून विद्यापिठाने १३ विद्यार्थ्यांना रुपये ७८५००/- अर्थसहाय्य मा.कुलगुरु महोदयांनी मान्य केले. त्या रक्कमेचे वितरण चेकद्वारे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आले.

* युवारंग युवक महोत्सव २०२० :- युवक महोत्सव २०२० चे आयोजन शहादा महाविद्यालयाने (जि. नंदुरबार) केलेले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातून २२ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाले. संघव्यवस्थापक म्हणून प्रा. दिलीप सोनवणे यांनी मेहनत घेतले.

**७) रंगोत्सव आणि बक्षिस वितरण सोहळा :-**

महाविद्यालयात दि. २५/०१/२०२० रोजी वार्षिक स्नेहसंमेलन रंगोत्सव साजरे करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली अर्पण करुन कार्यक्रमाला सुरु करण्यात

आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्‌घाटन ऐनपूर प.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष मा.भागवत भाऊ पाटील हे होते. प्रमुख पाहुणे ऐनपूर प.शि.प्र.मंडळाचे सचिव मा.संजय भाऊ पाटील हे होते. तसेच संचालक मंडळाचे सन्माननीय सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.एस.पी. उमरीवाड यांनी केले तर वार्षिक अहवाल वाचन उपप्राचार्य प्रा.डॉ.पी.आर.महाजन यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.व्ही.एन.रामटेके व प्रा. एस.आर.इंगळे यांनी केले, प्रमाणपत्राचे वितरणाचे सूत्र संचालन प्रा.व्ही.एच.पाटील यांनी केले. तर आभार प्रा.संदीप साळूंके यांनी मानले.

त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मिमिक्री, विडंबन, नृत्य, गीतगायन, नाटक, देशभक्तीपर गायन इ. कला सादर केले.

**८)** महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात वेळोवेळी थोर महापुरुषांचे जयंती व पुण्यतिथी साजरे करण्यात येतात. त्या निमित्ताने प्रतिमा पूजन व माल्यार्पण केले जाते. विविध व्याख्यातांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात येत असतात. यामध्ये प्रामुख्याने महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंडेकर, छ. शिवाजी महाराज जयंती, छ.शाहू महाराज जयंती, सरदार पटेल, संत गाडगे महाराज, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम य ा व अशा राष्ट्रपुरुषांचे जयंती व पुण्यतिथी साजरे करण्यात आले. जागतिक आदिवासी दिवस ९ ऑगस्ट २०१९.

**९) विविध कार्यशाळेत प्रतिनिधित्व :-**

विद्यापीठामार्फत आयोजित विविध कार्यशाळेत - विविध महाविद्यालयात होणाऱ्या कार्यशाळेसाठी महाविद्यायालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनी सहभाग घेऊन आपल्या व्यक्तिमत्व विकासात वाढ करतात. दि. १०/०१/२०२० रोजी विद्यापीठ स्तरीय विद्यार्थिनी व्यकितमत्व विकास कार्यशाळा, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, ता.यावल, जि.जळगाव येथे आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये एकूण १२ विद्यार्थीनिनी सहभाग नोंदविला. दि. ०८/०१/२०२० रोजी भालोद कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे विद्यापीठ स्तरीय विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत १० विद्यार्थीनी सहभाग घेतला होता. दि. २८/०१/२०२० रोजी व्ही.एस.नाईक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेर येते विद्यापीठस्तरीय विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत १० विद्यार्थिनी सहभागी झाल्या. दि. ०९/०९/२०१९ रोजी संवेदना फाऊंडेशन मुक्ताईनगर जि. जळगाव यांच्या विद्यमाने खुली निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले त्यात १३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविले होते. तसेच बेटी बचाओ-बेटी पढाओ आंदोलनातील अग्रणी मा.डॉ. राजेंद्र फडके यांनी महाविद्यालयात उक्त विषयावर व्याख्यानासाठी आले असता कु.साक्षी चंपालाल महाजन या दिव्यांग विद्यार्थीनीला ११००/- रु. भेट शैक्षणिक कामाकरीता आर्थिक सहाय्य केले.

**प्रा. एस.पी.उमरीवाड**
विद्यार्थी विकास अधिकारी समन्वयक

## प्राध्यापक प्रबोधिनी मंडळ- अहवाल २०१९-२०

महाविद्यालयात चालु शैक्षणिक वर्षात प्राध्यापक प्रबोधिनी मंडळाची स्थापना होवून उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्तविक चेअरमन प्रा.एस.बी.महाजन यांनी केले. मंडळाचे सदस्य प्रा.एस.आर.इंगळे सुत्रसंचलन यांनी केले. कार्यक्रमास मंडळाचे सदस्य प्रा.के.एल.हिरोळे, प्रा. व्ही.एच. पाटील, प्रा.एन.यु.बारी तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

चालू शैक्षणिक वर्षात विविद तज्ञ प्राध्यापकांमार्फत व्याक्यानांचे आयोजन करुन प्राध्यापकांच्या संशोधनाचा सामाजिक विकासाठी तेसच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन मिर्माण कसा व्हावा या बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. या बरोबरच प्राध्यापकांनी प्राप्त केलेले यश व विद्यापीठात विविध समित्यांवर झालेल्या निवडी बद्दल मंडळातर्फे सत्कार करण्यात आला.

सत्कारार्थी

| | |
|---|---|
| १. डॉ. एस.एन.झोपे | Ph.D. पदवी प्राप्त |
| २. डॉ. के.जी.कोल्हे | Applied Science Bos Member निवडी बद्दल |
| ३. डॉ. आर.व्ही.भोळे | Geography Bos Member निवडी बद्दल |
| ४. डॉ. एस.स.पाटील | Botany Bos and Boe Member निवडी बद्दल |
| ५. डॉ. निता एस.वाणक्ष | B. Voch Bos Member निवडी बद्दल |

वर्षभरात मंडळाच्या कार्यक्रमांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच. मंडळाचे सर्व सदस्य व सर्व सहकारी प्राध्यापकांचे वेळोवेळी सहकार्य लाभले.

**प्रा. एस.बी.महाजन**
चेअरमन

## विज्ञान मंडळ अहवाल

स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये विज्ञान सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन दिनांक १९ सप्टेंबर २०१९ रोजी करण्यात आले होते. सदर परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारावर विज्ञान प्रश्न मंजुषा कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. सदर परीक्षेतील वर्गवार गुणवत्तेनुसार ५६ पैकी १२ विद्यार्थ्यांची निवड प्रश्न मंजुषा या स्पर्धेकरिता करण्यात आली. ही स्पर्धा या १२ विद्यार्थ्यांचे ४ गट करुन घेण्यात आली. खूप चुरशीच्या या स्पर्धेत विजयी गट नंबर १ (गट प्रमुख शुभम सुरेश पाटील – तृतीय वर्ष विज्ञान) व उपविजयी गट नंबर ४ (गट प्रमुख युक्ता ज्ञानेश्वर चौधरी – द्वितीय वर्ष विज्ञान) हे ठरले.

तसेच विज्ञान मंडळ अंतर्गत 'विज्ञान दिवस' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने हे होते. यात डॉ. एस.ए. पाटील तसेच डॉ. डी.बी. पाटील यांनी विज्ञान दिवस या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात प्रा. एस.आर. इंगळे, डॉ. एस.एन. वैष्णव हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार डॉ. जे.पी. नेहेते यांनी मानले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ. डी.बी. पाटील**
समन्वयक, विज्ञान मंडळ

# क्रीडा विभाग (जिमखाना विभाग) अहवाल २०१९-२०

सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध खेळात समाधानकारक कामगीरी बजावली आहे. तसेच महाविद्यालयातील मुल व मुलींनी आंतर महाविद्यालयीन विविध स्पर्धेचा संघामध्ये सहभाग घेतला. सन २०१९–२० मध्ये विशेष बाब म्हणजे आंतर महविद्यालयीन क्रिकेट मुलींची निवड चाचणी घेण्यात आली. यात खालील प्रमाणे संघ सहभागी झाले होते.

**१) बुद्धीबळ –** सदर बुद्धीबळ आंतर महाविद्यालयीन स्पर्धा या डॉ.जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात संपन्न झाल्या यात महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंनी सहभाग घेतला व पाच मॅचेस पैकी तीन मॅचेस मध्ये विभागणी झाली.

**२) क्रॉस कन्ट्री –** सदर स्पर्धा आंतर महाविद्यालयीन या एस.एन. कॉलेज मुक्ताईनगर येथे संपन्न झाल्या. यात पाच खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता.

**३) जलतरण–** सदर आंतर महाविद्यालयीन स्पर्धा या एम.जे. कॉलेज जळगाव एकलव्य क्रिडा संकुलाच्या जलतरण जळगावात संपन्न झाल्या. यात महाविद्यालयाच्या तीन खेळाडूंनी सहभाग घेतला.

**४) मैदानी स्पर्धा –** सदर आंतर महाविद्यालयीन स्पर्धा डी.एन. कॉलेज, फैजपूर येथे संपन्न झाल्या. यात पाच खेळाडूंनी १०० मीटर, २०० मीटर, थाळीफेक, लांबउडी यात आपला सहभाग नोंदवला.

**६) क्रिकेट –** सदर आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा एम.जे. कॉलेज जळगाव येथे आपण सहभाग नोंदविला. या महाविद्यालयामध्ये प्रथम सामना द.ना. भोळे महाविद्यालय भुसावळ यांचा पराभव करुन प्रथम विजय संपादन केला. यात कु. हर्षद खान सलमान खान, एस.वाय.बी.ए. चा खेळाडू याची आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेत निवड करण्यात आली. सदर आंतर महाविद्यालयीन क्रिकेट सामने नंदूरबार सैनिकी शाळेच्या मैदानावर संपन्न झाल्या.

**७) क्रिकेट (महिला) –** सदर आंतर महाविद्यालयीन निवड चाचणी घेण्यात आली. सदर निवड चाचणी स्पर्धा ही एम.जे. कॉलेज येथे घेण्यात आली. यात आंतर विभागीय स्पर्धासाठी कु. अश्विनी तायडे एस.वाय.बी.एस्सी. हिची निवड झाली व आंतर विभागीय क्रिकेट महीला स्पर्धा नंदूरबार येथे संपन्न झाल्या. यात कु. अश्विनी तायडे हिची आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट संघात निवड झझली. सदर आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धा बरकतुल्ला विद्यापीठ भोपाल येथे झाले.

**८) बेसबॉल –** सदर आंतर महाविद्यालयीन बेसबॉल स्पर्धा या डी.एन. कॉलेज फैजपूर येथे संपन्न झाल्या. यात सचिन ईश्वर महाजन एस.वाय.बी.एस्सी. खेळाडू यांची आंतर विभागात निवड करण्यात आली. सदर आंतरविभागीय बेसबॉल स्पर्धा पू. साने गुरुजी महाविद्यालय, शहादा येथे संपन्न झाल्या.

**९) सॉफ्टबॉल –** सदर आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा डी.एन. कॉलेज फैजपूर येथे सपन्न झाल्या. यात मयूर गोपाल पाटील एस.वाय.बी.एस्सी. याने चांगला खेळ करुन विभागीय स्पर्धेत निवड करण्यात आली. सदर आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा एस.एस.बी.टी. इंजिनियर कॉलेज जळगाव येथे संपन्न झाल्या. यात कु. मयुर गोपाल पाटील या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करुन आंतरविद्यापीठ संघात त्यांची निवड करण्यात आली. सदर आंतर विद्यापीठ स्पर्धा योगी बेमन्ना विद्यापीठ कल्पा, आंधद्रप्रदेश येथे आयोजित करण्यात आले होते.

**१०) बॅडमिंटन –** स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालयाचे सन २०१९–२०२० या वर्षी प्रथमच आंतर महाविद्यालयीन मुले, मुली सहभाग नोंदविला होता. सदर आंतर महाविद्यालयीन मुले व मुली स्पर्धा एम.जे. कॉलेज येथील एकलव्य क्रिडा संकूल इन डोअर हॉल मध्ये संपन्न झाल्या.

**– आंतर विभागीय खेळाडू –**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | हर्षद खान सलमान खान | – क्रिकेट | – | नंदूरबार |
| २) | सचिन ईश्वर महाजन | – बेसबॉल | – | शहादा |

**– आंतर विद्यापीठ खेळाडू –**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | आश्विनी तायडे | – क्रिकेट | – | बरकतूल्ला विद्यापीठ, भोपाळ |
| २) | मयूर गोपाल पाटील | – सॉफ्टबॉल | – | योगी बेमन्ना विद्यापीठ, आंध्रप्रदेश |

जिमखाना विभागाच्या विशाल कारभारात प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने, डॉ.के.जी.कोल्हे, क्रिडा संचालक प्रा. सचिन झोपे, डॉ. पी.आर.गवळी, प्रा.एन.यु.बारी, प्रॉ.सौ.डॉ.रेखा पाटील, मुख्यलिपीक श्री.गोपाळ महाजन यांचे सहकार्य लाभले.

**प्रा.सचिन झोपे**
क्रिडा प्रमुख (जिमखाना विभाग)

---

# विद्यार्थी समुपदेशन केंद्र
# अहवाल २०१९-२०

महाविद्यालयात विद्यार्थी समुपदेशन केंद्रामार्फत कार्यशाळेचे आयोजन दि. ४/१०/२०१९ व ९/३/२०२० रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे समन्वयक व समुपदेशक प्रा.व्ही.एन.रामटेके, विद्यार्थी समुपदेशन केंद्र व चाचणी केंद्र, मानसशास्त्र विभाग, सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर यांनी विद्यार्थ्यांना मानसिक स्वास्थ व शारीरिक स्वास्थ योग्य ठेवायचे असेल व स्मृतीमध्ये सुधारणा करायची असेल तर रोज ध्यान करणे आवश्यक आहे. असे मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.एस.पी. उमरीवाड यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास करुनच परीक्षा द्यावी असे मार्गदर्शन केले.

तसेच महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.एन.एस.वाणी यांनीही परिक्षे संबंधी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा.व्ही.एच. पाटील यांनी केले. या कार्यशाळेच्या आयोजना करिता कार्यशाळेचे समन्वयक समुपदेशन केंद्राचे समुपदेशक प्रा.व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.पी.आर. गवळी यांनी केले. व कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रा. व्ही.एन.रामटेके**
समुपदेशक

# रसायनशास्त्र विभाग

महाविद्यालयातील विज्ञान शाखेत प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी रसायनशास्त्र हा विषय विशेष स्तरावर १९९५-९६ या वर्षापासून सुरु करण्यात आला. विभागात खालील प्रमाणे प्राध्यापक कार्यरत आहेत.

१) प्रा. डॉ. सतीश. नथूदास. वैष्णव (विभाग प्रमुख)
२) प्रा. सुनील रमेश इंगळे (सहाय्यक प्राध्यापक)
३) प्रा. डॉ. दिपक भगवान पाटील (सहाय्यक प्राध्यापक)
४) प्रा. डॉ. जयंत प्रल्हाद नेहेते (सहाय्यक प्राध्यापक)
५) कु. पूजा मदनलाल कुमावत
६) कु. वैशाली गोपाल पाटील

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विभागात पद्व्युत्तर स्तरावर नवीन विषय कार्बनी रसायनशास्त्र सुरु करण्यात आला. सदर विषयास एकूण १६ विद्यार्थ्यानी प्रवेश घेतला. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानसार औद्योगिक सहलीसाठी श्री. शितल प्लास्टपाल रोड, रावेर येथे दिनाक ११/०३/२०२० रोजी भेट देण्यात आली. सदर इंडस्ट्री मध्ये ठिबक सिंचनात वापरल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या नळ्यांचे तसेच नळ्यांची पुननिर्मिती केली जाते. सदर उत्पादन प्रक्रियेचे विश्लेषण श्री. पवन महाजन यांनी केले. विद्यार्थ्यांना उत्पादन प्रक्रिया सविस्तरपणे समजावून सांगितली व विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले. सदर सहलीचे आयोजन रसायनशास्त्र विभागातर्फे करण्यात आले. विभागातर्फे ''सॉईल एनालिसीस'' हा सर्टिफिकेट कोर्स सुरु करण्यात आला. डॉ. सतिश वैष्णव यांना कवयित्री बहिणीबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची २०१९-२० पासून पीएच.डी.मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली.

दादासाहेब देविदास भोळे महाविद्यालय, भुसावळ येथे दिनांक ०३/०१/२०२० रोजी राष्ट्रीय परिषदेत प्रा. सुनील इंगळे आणि डॉ. सतीश वैष्णव यांनी सहभाग नोंदविला. डॉ. जयंत नेहेते यांनी शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव येथे १४/०२/२०२० रोजी राष्ट्रीय परिषदेत पेपर सादर केला. डॉ. सतीश वैष्णव यांनी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिंदखेड येथे दिनांक १०/०२/२०२० रोजी तृतीय वर्ष विज्ञान वर्गाच्या कार्बनी रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळेत सहभाग नोंदवला. प्रा. सुनील इंगळे यांनी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे दिनांक १८/०२/२०१९ रोजी तृतीय वर्ष विज्ञान वर्गाच्या अकार्बनी रसायनशास्त्र विषयाच्या सिल्याबस रीस्ट्रक्चरिंग कार्यशाळेत सहभाग नोंदवला.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील विभागाचा निकाल खालील प्रमाणे आहे.

तृतीय वर्ष विज्ञान

१) कचरे शितल ईश्वर (८२.४३) - प्रथम क्रमांक
२) पाटील संजना मुकेश (७९.६५ - द्वितीय क्रमांक
३) पाटील शैलेंद्र मुरलीधर (७७.३५) - तृतीय क्रमांक

ज्या विद्यार्थ्यांनी विशेष क्रमांक प्राप्त केले अशा सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी संस्थेचे संचालक मंडळ, प्राचार्य, विभागातील प्राध्यापक प्रयत्नशील आहे.

**डॉ. सतीश नथूदास वैष्णव**
(विभाग प्रमुख)

## रसायन शास्त्र मंडळ

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे रसायनशास्त्र मंडळाची स्थापना शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये करण्यात आली. विद्यार्थ्यांची रसायनशास्त्र या विषयात आवड निर्माण व्हावी त्यासाठी सदर मंडळा तर्फे विविध तज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यान, परीक्षांचे आयोजन करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये रसायनशास्त्र मंडळाचे उद्‌घाटन मा.प्रा.डॉ.एन.सोनार, व्ही. एस. नाईक महाविद्यालय, रावेर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना फिजिकल केमेस्ट्री या विषयावर मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या विविध शंकाचे निरसन केले. दिनांक २८/०२/२०२० रोजी रसायनशास्त्र मंडळा आणि विज्ञान  मंडळ यांचा संयुक्त विद्यमाने विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. प्रा. डॉ.डी.बी.पाटील प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाविषयी सविस्तर माहिती सांगितली व विविध शंकांचे निरसन केले. तसेच आपल्या भाषणात विज्ञान आणि तंत्रज्ञानातील शोधांचा वापर हा शांतता प्रस्थापित करण्यासाठी झाला पाहिजे असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी संस्थेचे अध्यक्ष, चेअरमन, सचिव, सर्व संचालक मंडल, प्राचार्य व विभागातील सर्व प्राध्यापक प्रयत्नशील आहेत.

**डॉ. जयंत प्रल्हाद नेहेते**
रसायनशास्त्र मंडळ समन्वयक

---

## विद्यार्थी तक्रार निवारण समिती

सदर समितीच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या काही तक्रारी असल्यास त्या सोडवण्याचे कार्य केले जाते. या शैक्षणिक वर्षामध्ये समितीच्या दोन सभा संपन्न झाल्या सुरवातीच्या सभेमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रतिनिधीची निवड करण्यात आली त्यानंतर समितीमध्ये जवळच्या पोलिस स्टेशनचे पी.एस.आय महेश जानकर यांचा ही समावेश करण्यात आला. सदर या शैक्षणिक वर्षामध्ये कोणतीही तक्रार विद्याथीकडुन प्राप्त झालेली नाही. त्याबद्दल सर्वाचे कौतुक मा. प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांनी केले.

**प्रा.डॉ.पी.आर.महाजन**
समन्वयक
विद्यार्थी तक्रार निवारण समिती

# करिअर मार्गदर्शन अहवाल २०१९-२०२०

महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन केंद्रामार्फत करिअर संबंधी कार्यशाळेचे आयोजन दि. ०७/०२/२०२० रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे समन्वयक प्रा.व्ही.एन. रामटेके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मा. भारत साळवे इंग्लिश ट्रेनर नांदुरा यांनी करिअरमध्ये इंग्रज़ी विषयाचे महत्व यासंबंधी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे दूसरे मार्गदर्शक मा. व्ही.बी. डांगे, जी.जी. खडसे कॉलेज, मुक्ताईनगर यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये कॅरिअर करण्यासाठी इतिहासाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एसपी. उमरीवाड यांनी केले. या कार्यशाळेच्या आयोजनाकरिता कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.डॉ.व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.एस.पी.उमरीवाड, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.के.एल.हिरोळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी केले. व कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रा. व्ही.एन.रामटेके**
करिअर मार्गदर्शक केंद्र

---

# इतिहास विभाग अहवाल

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालयात, महाविद्यालयाच्या स्थापने पासून इतिहास विषय सुरु करण्यात आला.

इतिहास विभागामार्फत अजिंठा लेणी येथे सहल आयोजित केली होती. विद्यार्थ्यांना अजिंठा लेणीतील कोरीव काम, चित्र, शिल्प यांची माहिती विद्यार्थ्यांनी समजून घेतली.

मार्च / एप्रिल २०१९ मध्ये विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेचा महाविद्यालयाचा निकाल पुढील प्रमाणे.

२०१८–१९ या वर्षाचा निकाल पुढील प्रमाणे –

**द्वितीय वर्ष कला –**

प्रथम – सोनवणे लक्ष्मी राजू – ६६.७५%

द्वितीय – पारधे तेजस संजय – ५२.६७%

पास झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रा. के. एल. हिरोळे, प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी अभिनंदन व कौतुक केले.

**प्रा. के.एल.हिरोळे**
इतिहास विभाग प्रमुख

## शैक्षणिक सहल समिती अहवाल

महाविद्यालयातील विद्यार्थ्यामध्ये विषयाची आवड निर्माण व्हावी म्हणून विशेष विषयाचा वेग वेगळ्या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात करण्यात आले होते. या वर्षी मराठी विभागाची शैक्षणिक सहल पद्मालय येथे डॉ. सौ. रेखा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली. यावेळी प्रा.एम. के. सोनवणे यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच रसायनशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल रावेर येथील शितल प्लास्ट येथे काढण्यात आली. प्रा. डॉ. वैष्णव, प्रा.डॉ. डी.बी. पाटील, प्रा. जे.पी. नेहेते, व प्रा. एस.आर. इंगळे यांनी सहलीचे आयोजन केले होते.

अर्थशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल ओंकारेश्वर येथे प्रा. ज्ञानेश्वर कोळी यांनी आयोजित केली होती. इतिहास विभागाची शैक्षणिक सहल प्रा. के.एल. हिरोळे यांनी अजिंठा येथे आयोजित केली होती. संगणकशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल शिरवेल महादेव येथे प्रा. रुपाली बऱ्हाटे, प्रा. मोहिनी भंगाळे यांनी आयोजित केली होती.

**प्रा.एम.के.सोनवणे**
चेअरमन
शैक्षणिक सहल समिती

## माजी विद्यार्थी समिती

स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये माजी विद्यार्थी समितीद्वारा १६ एप्रिल २०२० रोजी टाळेबंदी असल्याकारणाने ऑनलाइन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्यासाठी माजी विद्यार्थ्यांना व्हॉट्सअप ग्रुप द्वारे आमंत्रित करण्यात आले होते. सदर मेळाव्यात कोविड–१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे माजी विद्यार्थ्यांनी सत्र परीक्षा होईल किंवा नाही यासंबंधी चर्चा केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने हे होते. या कार्यक्रमासाठी एकूण ३० माजी विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी आणि महाविद्यालय यांचा ऋणानुबंध कायमस्वरुपी असावा असे या मेळाव्यातून दिसून आले.

**प्रा. डॉ. डी. बी. पाटील**
समन्वयक
माजी विद्यार्थी समिती

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबद्दल आवड निर्माण व्हावी आणि विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जाता यावे यासाठी मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर केंद्रातर्फे विविध विषयातील तज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

विद्यार्थीना पदवीनंतर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक वाट या विषयावर डॉ. एस.एन.जैस्वाल, के.वाय.डी.एस.सी.टी. महाविद्यालय, साकेगाव यांनी मार्गदर्शन केले. श्री. शेखर डी. महाजन आणि कु. रुपाली चौधरी के.वाय.डी. एस.सी.टी. महाविद्याल, साकेगाव एम.बी.ए. प्रवेश परीक्षा पूर्वतयारी या विषयावर दिनांक२७/१२/२०१९ रोजी मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षांची पूर्व तयारीसाठी महाविद्यालय आणि शायनिंग स्टार्स अकादमी रावेर यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षेचे आयोजन १५/०२/२०२० रोजी करण्यात आले. सदर परिक्षेसाठी एकूण १३५ विद्यार्थ्यींनी प्रवेश नोंदवला. सदर परीक्षेसाठी प्रा. नंदा जंगले आणि दिपक तायडे यांनी सहकार्य केले. तसेच त्यांनी आपल्या व्याखाना मध्ये स्पर्धा परीक्षांमार्फत भरली जाणारी शासकीय पदे, परीक्षेचे स्वरुप, पूर्वतयारी याबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच मुलाखतीच्या वेळेस कोणकोणत्या गोष्टी महत्वाच्या असतात याची माहिती दिली. स्पर्धा परीक्षांची पूर्व तयारीसाठी पुस्तकांची निवड, वेळेचे नियोजन या मुद्द्यावर संवाद साधला.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबद्दल जागृती निर्माण व्हावी त्यात ते यशस्वी व्हावेत यासाठी ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे मा.अध्यक्ष मा.चेअरमन मा.सचिव, सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे मा.प्राचार्य तसेच प्राध्यापक वृंद प्रयत्नशील आहे.

**डॉ. सतीश एन. वैष्णव**
समन्वयक

## आविष्कार

स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० यामध्ये क.ब.चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार २०१९ या स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयातून एकूण दोन सहभाग नोंदविण्यात आले होते. त्यात राजेश रमेश पाटील (तृतीय वर्ष विज्ञान) व पूनम डीगंबर पाटील (प्रथम वर्ष विज्ञान) यांनी सामाजिकशास्त्र या विषयातून 'लोकसंख्या विस्फोट' तसेच सचिन ईश्वर महाजन (द्वितीय वर्ष विज्ञान) व शुभांगी गणेश पाटील (प्रथम वर्ष विज्ञान) यांनी शिक्षण या विषयातून 'सत्र परीक्षा पध्दतीत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्यांचा अभ्यास' यावर जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक महाविद्यालय जळगाव येथे पोस्टर सादरीकरण केले.

**प्रा. डॉ. डी. बी. पाटील**
समन्वयक आविष्कार

## पारितोषिक वितरण समिती

महाविद्यालयात ग्रामीण भागातून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी तसेच त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी प्रत्येक वर्षी पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन केले जाते. महाविद्यालयास ज्या शिक्षणप्रेमी व दानशूर व्यक्तिनी बक्षीसासाठी देणगी दिलेली आहे. ती सर्व एकत्रित रक्कम सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा निंभोरा येथे ठेवीच्या रुपात ठेवून त्या रकमेवर येणारे व्याज विभागून विद्यार्थ्याना बक्षिसांच्या रुपात दिले जातात. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये वार्षिक बक्षिस वितरण सोहळ्याचे आयोजन दि. २५ जानेवारी २०२० रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. भागवतभाऊ पाटील उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये महाविद्यालयात कला व विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष वर्गातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष मा. भागवत पाटील, चेअरमन मा. श्रीराम पाटील, सचिव मा.संजय पाटील व संचालक मंडळ, श्री. विकास महाजन, श्री.पी.आर.चौधरी, श्री. हरी पाटील, डॉ. सतिश पाटील, श्री. आर. एस. पाटील, प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या हस्ते रोख बक्षिसे देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.एस.आर.इंगळे व प्रा.एस.बी. महाजन यांनी केले. व आभार डॉ. पी.आर. महाजन यांनी मानले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**प्रा. एस.आर. इंगळे**

चेअरमन

पारितोषिक वितरण समिती

---

## समान - संधी केंद्र

समान संधी केंद्रा मार्फत विविध कार्यशाळेचे व्याख्यानाचे स्पर्धाचे वर्षभरात आयोजन करण्यात येते. विविध तंज्ञ मार्गदर्शक वक्त्यांचे लिंग समता स्पर्धा परिक्षेतील यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. परीक्षेतील स्पर्धतील संधी या विषयावर तसेच महिलांचे अधिकार व त्यांचे विविध समस्या या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

त्याचबरोबर बेटी बचाओ बेटी पढाओ, मतदान जनजागृती, रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा त्याच बरोबर सायबर क्राईम, रॅगिंग विषयी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**प्रा. एस.पी. उमरीवाड**

चेअरमन

# युवती सभा

महाविद्यालयातील युवतींमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांचा विकास व्हावा सामुहिक आणि वैयक्तिक जीवनामध्ये त्यांच्यातील नेतृत्वगुणाचा विकास व्हावा, या उद्देशाने विद्यापीठ परिपत्रकानुसार २०१९–२०२० या शैक्षणिक वर्षासाठी युवतीसभेची स्थापना करण्यात आली. युवतीसभेमुळे युवतींना येणाऱ्या समस्या स्वतंत्र व्यासपीठावर मांडता येतात. या विचारमंचाच्या आधारे युवतीसभेच्या माध्यमातून विविध कार्यक्रम राबविले जातात, शैक्षणिक वर्ष २०१९–२०२० मध्ये युवतीसभेद्वारे पुढील कार्यक्रम राबविण्यात आले.

युवतीसभेची स्थापना व उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांच्या शुभहस्ते दि. ११/०८/२०१९ करण्यात आले.

❋ वक्तृत्व स्पर्धा : विषय– स्त्रीभृणहत्या दि. १३/०९/२०१९

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक – | पाटील शुभांगी गणेश – | प्रथम वर्ष विज्ञान |
| द्वितीय क्रमांक – | महाजन भावना सुनिल – | द्वितीय वर्ष विज्ञान |
| तृतीय क्रमांक – | चौधरी विद्या गणेश – | प्रथम वर्ष कला |

❋ निबंध स्पर्धा : विषय – प्रसार माध्यमांमध्ये प्रचलित असलेली स्त्रीची प्रतिमा दि. १८/०९/२०१९

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक – | तायडे दिक्षा राजेंद्र – | एम.ए. प्रथम वर्ष |
| द्वितीय क्रमांक – | पाटील पूजा सुनिल – | प्रथम वर्ष विज्ञान |
| तृतीय क्रमांक – | पाटील माधुरी नारायण – | द्वितीय वर्ष कला |
| उत्तेजनार्थ – | चौधरी गायत्री सुरेश – | द्वितीय वर्ष विज्ञान |
| | तायडे लक्ष्मी उमेश्वर– | द्वितीय वर्ष विज्ञान |

❋ पारंपारिक वेशभूषा दिवस आणि चर्चासत्र

चर्चेचा विषय – मुलींना घरकाम अनिवार्य असावे काय ?

प्रमुख व्याख्याते – प्रा.डॉ. निता वाणी दि. ०७/०९/२०१९

❋ सावित्रीबाई फुले जयंती महिला दिन दि. ०३ जानेवारी २०२०

❋ विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन दि. ०७ जानेवारी २०२० रोजी करण्यात आले. त्यात प्राचार्य डॉ. अरुणाताई शिरीष चौधरी यांनी महिलांचे आरोग्य, प्रा.डॉ. किर्ती उबाळे यांनी 'मी स्वंय सिध्दा' ॲड. विद्या सोनार यांनी 'महिला विषयक कायदे' आणि प्रा.डॉ. सविता वाघमारे यांनी 'महिलांचे समाजव्यवस्थेतील स्थान' या विषयावर व्याख्याने दिले. या कार्यक्रमात १२२ विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला.

❋ युवती सभा अंतर्गत दि. १६ जानेवारी ते २४ जानेवारी २०२० या कालावधित स्वयंसिध्दा अभियान घेण्यात आले. त्या अंतर्गत विद्यार्थीनींना कराटे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षक म्हणून राजेंद्र सुरवाडे, गणेश जलंकार आणि वसीम तडवी यांनी मेहनत घेतली. महाविद्यालयातील ६४ विद्यार्थीनींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

❋ जागतिक महिला दिन दि. ०८ मार्च २०२०

प्रमुख वक्त्या – प्रा.डॉ. नीता वाणी

अध्यक्ष – प्राचार्य डॉ. ज.बा. अंजने

**प्रा.डॉ. रेखा पी. पाटील**
युवती सभा सचिव

# राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक विद्यार्थ्यांन मध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी तसेच त्यांनी राष्ट्र उभारणीत आणि राष्ट्र विकासात निरपेक्ष वृत्तीने सहभागी होण्यासाठ प्रयत्नशील आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत नियमित कार्यक्रमासाठी १४० व विशेष हिवाळी शिबिरात ७० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

महाराष्ट्र शासन आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या परीपत्राकान्वये नेमून दिलेल्या विविध कार्यक्रमाचे आयोजन रासेयो एकक राबवते. नियमित कार्यक्रमा मध्ये जागतिक योग दिवस, आंतरराष्ट्रीय लोकसंख्या दिवस, आंतर राष्ट्रीय साक्षरता दिवस, सद्‌भावना दिवस, स्वतंत्रता दिवस, आंतर राष्ट्रीय लोकसंख्या दिवस, आंतर राष्ट्रीय शांतता दिवस, रासेयो स्थापना दिवस, राष्ट्रीय युवक दिवस, विद्यार्थी दिवस, शहीद दिन, सर्जिकल स्ट्राईक दिवस, राष्ट्रीय रक्तदान दिवस, अहिंसा दिवस, एकता दिवस, संविधान दिवस, जागतिक महिला दिवस, राष्ट्र पुरुषांची जयंती व पुण्यतिथी असे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. वन महोत्सव या कार्यक्रम निमित्ताने ०१/०७/२०१९ पासून १०/०७/२०१९ या कालावधीत महाविद्यालय परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. स्वच्छता अभियान : १०० तास स्वच्छतेसाठी या उपक्रम अंतर्गत स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर तसेच दत्तक वस्ती धामोडी येथे स्वच्छतेसाठी या उपक्रम अंतर्गत स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर तसेच दत्तक वस्ती धामोडी येथे स्वच्छता अभियान राबविले. त्यात प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थी आणि ग्रामस्थासाठी पोस्टर प्रदर्शना द्वारे जनजागृती केली. दिनांक १/०८/२०१९ ते १५/०८/२०१९ दरम्यान स्वच्छता पंधरवाडा साजरा करण्यात आला. त्याअंतर्गत महाविद्यालयात, ऐनपूर गावात आणि दत्तक वस्ती धामोडी ता. रावेर येथे स्वच्छता अभियान राबविले व जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे एकदिवशीय शिबीर दिनांक १३/१०/२०१९ रोजी दत्तक वस्ती धामोडी ता. रावेर येथील जि.प.मराठी शाळेत संपन्न झाले. सदर शिबिरात उपप्राचार्य डॉ. पी.आर. महाजन आणि प्रा. एस.डी. धापसे यांचे मार्गदर्शन लाभले.

राष्टीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दिनांक २६/१२/१९ ते ०३/०१/२० या कालावधीत दत्तक वस्ती धामोडी ता. रावेर येथील जि.प.मराठी शाळेत संपन्न झाले. सदर शिबिराच्या निमित्ताने एक पाऊल डिजिटल साक्षरतेकडे, सौर उर्जेचा वापर, ग्रामविकासात युवकांची भूमिका, रक्तदान-श्रेष्ठदान, आपत्ती व्यवस्थापन, अवयवदान, सोसीअल मेडिया चा समाजावर होणारा परिणाम, अंधश्रध्दा निर्मुलन जातिमुक्त समृध्द भारत, पर्यावरण संवर्धन, बेटी बचाव बेटी पढाव, राष्ट्रीय शिक्षण हक्क कायदा, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन अशा विविध विषयावर तज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. तसेच रासेयो स्वयंसेवकांनी शाळेच परिसर, रस्ते, विठ्ठल मंदिर परिसर अशा विविध ठिकाणी स्वच्छता अभियान राबविले. जि.प. शाळेतील खोल्यांच्या मागे वाढलेले गवत व झुडपे उपटून काढली. माध्यमिक विद्यालयाची मुतारी आणि अंगणवाडीच्या सांडपाण्याची व्यवस्था करुन शोष खड्डा

तयार करुन दिला. श्रमदाना मध्ये धामोडी गावातून अंगणवाडी कडे येणारा रस्ता तयार केला. जि.प.मराठी शाळेच्या आवारात घन कचरा व्यवस्थापनासाठी कंपोस्ट खड्डा तयार करुन जमा झालेला कचरा,कंपोस्ट खड्डात टाकून त्याची विल्हेवाट लावली. धामोडी गावात जनगागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले, त्यात व्यसनमुक्ती विषयावर पथनाट्य सादरीकरण झाले. रासेयो स्वयंसेवक, नितीन महाजन, विठ्ठल पाटील, गोपाल कोळी यांनी परिश्रम घेतले.

सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. दिपक पाटील यांनी दिनांक २८/०१/२०२० ते ०३/०२/२०२० या कालावधीत व कार्यक्रम अधिकारी डॉ. जयंत नेहेते यांनी दिनांक २३/०२/२०२० ते २९/०२/२०२० या NSS ETI Ahmednagar College, Ahmednagar कालावधीत येथे राष्ट्रीय सेवा योजनाच्या उजळणी वर्गाचे प्रशिक्षण पूर्ण केले.

राष्टीय सेवा योजनेच्या सर्व कार्यक्रमाचे आयोजन मा.प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने, जिल्हा व विभागीय समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. जयंत नेहेते, सहाय्यक कार्यक्रमअधिकारी डॉ. दिपक पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.रेखा पाटील आणि स्वयंसवक यांनी केले. या शैक्षणिक वर्षातील सर्व कार्यक्रमांसाठी ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष, चेअरमन, सचिव आणि संचालक यांचे मार्गदर्शन आणि उपस्थिती लाभली.

**डॉ. जयंत प्रल्हाद नेहेते**
कार्यक्रम अधिकारी

---

## AISHE
## All India Survey on Higher Education

महाविद्यालयाची चालू शैक्षणिक वर्षाची सर्व विभागांची माहिती, शिक्षक व शिकेत्तर कमर्चारी, मागिल शैक्षणिक वर्षाचा निकाल, शिष्यवृत्ती इत्यादी माहिती दरवर्षी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने व वरिष्ठ लिपीक श्री. पी.व्ही महाजन यांच्या मदतीने महाविद्यालयाचे नोडल ऑफिसर प्रा. एस.बी.महाजन यांनी भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाकडे पाठविला.

भारतातील विद्यापिठे, महाविद्यलये यांची माहिती राज्यनिहय गोळा केली जाते. या साठी दरवर्षी कार्यशाळांचे योजन होते. कार्यशाळेत मिळालेल्या माहितीच्या आधार अहवाल तयार केला जातो.

**प्रा. एस.बी. महाजन**
नोडल ऑफीसर

# राष्ट्रीय चर्चासत्र अहवाल

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन ११ जानेवारी २०२० रोजी करण्यात आले सकाळी ८.०० वाजेपासून १०.०० वाजेपर्यंत नोंदणी, चहा नाश्ताची व्यवस्था करण्यात आली.

**प्रथम सत्र–उद्घाटन**

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय आणि कवयित्री बहिणबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे मा.श्री. भागवत विश्वनाथ पाटील यांनी भूषविले. प्रा. किशोर देसाई– उका तरसाडी विद्यापीठ बारडोली, गुजरात यांच्या शुभ हस्ते चर्चा सत्राचे उद्‌घाटन झाले. सदर चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे संचालक श्री रामदास महाजन, प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने, भालोद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एस.कोल्हे, व्ही.एस.नाईक रावेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.व्ही.दलाल, शेंदुर्णी महाविद्यालयाच प्राचार्य डॉ.व्ही.आर पाटील तसेच डॉ अनिल पाटील आणि डॉ.के.डी.कोल्हे सिनेट सदस्य कबचौ उ.म.वि.जळगाव, वनस्पती शास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.डी.ए.कुमावत उपस्थित होते. समन्वयक डॉ. सतीश वैष्णव यांनी प्रास्ताविक सादर केले. कार्यक्रमाच्या सुरवातीला विद्यार्थीनींनी स्वागत गीत सादर केले. त्यानंतर लोहपुरुष सदरदार पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करुन दीपप्रज्वलन करण्यात आले आणि मान्यवरांचे स्वागत करण्यात आले प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी आपल्या भाषणात चर्चासत्राच्या आयोजन मागची भूमिका स्पष्ट केली. तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी चर्चासत्रासाठी अनुदान उपलब्ध करुन दिले त्याबद्दल आभार व्यक्त केले. उद्घाटनपर भाषणात प्रा.किशोर देसाई यांनी पर्यावरणातील प्रदूषण कमी करण्यासाठी ग्रीन सिन्थेसिसचा वापर करावा असे मत मांडले. अध्यक्षीय समारोपात प्रदूषण होणार नाही याची काळजी घेणे ही समाजातील सर्व घटकांची जबाबदारी आहे असे मत मांडले. समन्वयक डॉ. सतीश वैष्णव यांनी उद्घाटनाच्या कार्यक्रमात उपस्थितांच आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. दिपक पाटील व प्रा. रुपाली बऱ्हाटे यांनी केले

**द्वितीय सत्र –बीजभाषण**

द्वितीय सत्रात प्रा. किशोर देसाई – उका तरसाडी विद्यापीठ बारडोली गुजरात यांनी बीजभाषणात शेतीतून उत्पादन घेत असताना रासायनिक खते कीटकनाशक व तणनाशके यांचा वापर कमी करुन जैविक कीटकनाशक व सेंद्रिय खतांचा वापर करुन शेती व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवावा. त्यांनी विविध औद्योगिक रसायने तयार करण्याच्या पध्दती सांगतल्या. या प्रसंगी या सत्राचे चेअरमन म्हणून डॉ. ए.एन.सोनार व रिपोर्टर म्हणून डॉ. जी.आर.चौधरी यांनी काम संभाळले.

**तृतीय सत्र –व्याख्यान**

प्रा वेणू त्रिवेदी शासकीय महाविद्यालय देवास मध्यप्रदेश यांनि विशेष व्याख्यानता ग्लोबल वॉर्मिंग कारणे व उपाय या बद्दल माहिती दिली. वातावरण स्वयंचलित वाहनाच्या धुराळ्यातून बाहेर पडणाऱ्या वेगवेगळ्या वायूमुळे निसर्गनिर्मित वायूंचे संतुलन बिघडून पृथ्वीचे तापमान २.५ सेल्सिअस अंशाने वाढ झालेली आहे. या प्रसंगी या

सत्राचे चेअरमन म्हणून प्रा.डॉ.डी.एन.पाटील वाघोली पुणे, व रिपोर्टर म्हणून डॉ. एन.ए.चौधरी यांनी कामकाज पाहिले.

**तृतीयसत्रानंतर १.०० ते २.०० या कालावधीत भोजनाचे आयोजन करण्यात आले.**

**चतुर्थ सत्र –मौखिक संशोधन निबंध सादरीकरण**

चतुर्थ सत्रात मौखिक संशोधन निबंध सादरीकरण घेण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मध्ये आणि डिजिटल क्लासरुम या दोन ठिकाणी सादरीकरण घेण्यात आले. महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मध्ये या सत्राचे चेअरमन डॉ. आर.व्ही.भोळे आणि डॉ.पी.आर.महाजन यांनी कामकाज बघितले. या ठिकाणी एकूण ११ मौखिक संशोधन निबंध सादरीकरण झाले. तसेच डिजिटल क्लासरुम मध्ये १४ मौखिक संशोधन निबंध सादरीकरण झाले. उत्कृष्ट संशोधन पेपर सादरीकरणनासाठी प्रा.डॉ.योगेश तायडे डी. एन. कॉलेज फैजपूर यांना ५००/– रुपये पारितोषिक देण्यात आले. यावेळी डॉ.जे.एस.धांडे व डॉ. ए.एस. कोल्हे यांनी कामकाज पाहिले.

**पाचवे सत्र – पोस्टर संशोधन निबंध सादरीकरण**

या सत्रात विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी तेसच पद्व्युत्तर विद्यार्थ्यांनी आपले पोस्टर संशोधन निबंध सादरीकरण केले. यात एकूण १७ लोकांनी सहभाग नोंदवला. यावेळी संशोधनाची गुणवत्ता पाहून उत्कृष्ट पोष्टर निवड केली. उत्कृष्ट पोस्टर सादरीकरण साठी प्रा. योगिता पाटील नाहटा महाविदयलय भुसावळ यांना ५००/– रुपये पारितोषिक देण्यात आले. यावेळी डॉ. ए.एन. सोनार व डॉ.व्ही.पी. पवार यांनी कामकाज पाहिले.

**सहावे सत्र – राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप**

राष्ट्रीय चर्चासत्राचे समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने, हे होते आणि भालोद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एस.कोल्हे, डॉ. जे.एस.धांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते या वेळी राष्ट्रीय चर्चा सत्रात सहभागी झालेल्या प्रा.डॉ.योगेश तायडे डी.एन.कॉलेज फैजपूर, प्रा.मोहिनी तायडे भालोद महाविद्यालय, ए.एच.शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले यानंतर राष्ट्र गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रमाचे आभार समन्वयक डॉ.सतिष वैष्णव यांनी केले. सदर चर्चासत्रात भारतातील विविध विद्यापीठ, महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी मिळून एकूण २०० संशोधकांनी सहभाग नोंदवीला, सूत्रसंचालन डॉ. दिपक पाटील व कु. रुपाली बऱ्हाटे यांनी केले. मा. प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक डॉ. सतिष वैष्णव सहसमन्वयक डॉ. रमेश विठ्ठल भोळे, सेक्रेटरी डॉ. जयंत नेहेते, आयोजन समिती सदस्य डॉ. दिपक पाटील, डॉ. किशोर कोल्हे, डॉ. सतिष पाटील, प्रा.हेमंत बाविस्कर, डॉ. प्रविण महजान, प्रा. संजय महाजन, प्रा. संजय पाटील, प्रा. सुनील इंगळे तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**डॉ. सतिष वैष्णव**
समन्वयक

**डॉ. जे.बी.अंजने**
प्राचार्य

## संगणकशास्त्र विभाग

महाविद्यालयात विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी विशेष स्तरावर संगणकशास्त्र हा विषय जुन २००८ पासून सुरु करण्यात आला आहे.

**चालू शैक्षणिक वर्षात संगणकशास्त्र विभागात खालील प्राध्यापक कार्यरत आहेत.**

१) प्रा. रुपाली चंद्रकांत बऱ्हाटे
२) प्रा. मोहिनी कैलास भंगाळे
३) प्रा. मनिषा मधुकर महाजन

**विभागाचा २०१८-१९ वर्षांचा निकाल खालीलप्रमाणे :-**

प्रथम वर्ष विज्ञान (संगणक शास्त्र) – १) रितीक मोहन पाटील (प्रथम क्रमांक)
२) कोमल दत्तात्रय सुतार (द्वितीय क्रमांक)

द्वितीय वर्ष विज्ञान (संगणकशास्त्र) – १) आरती रविंद्र पाटील (प्रथम क्रमांक)
२) शुभम सुरेश पाटील (द्वितीय क्रमांक)
३) काजल सुनिल मनसुटे (तृतीय)

तृतीय वर्ष विज्ञान (संगणकशास्त्र) – १) अंकिता रमेश चौधरी (प्रथम क्रमांक)
(Second Rank in NMU)
२) अपूर्वा विजय महाजन (द्वितीय क्रमांक)
३) दिप्ती गोकुळ पाटील (तृतीय क्रमांक)

**प्रा. एच.एम. बाविस्कर**
विभाग प्रमुख

**प्रा. एस.बी. महाजन**
समन्वयक

---

## परीक्षा तक्रार निवारण समिती

सदर समिती ही प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांच्या अध्यक्षतेखाली काम करते. सदर समितीच्या समोर परीक्षे संदर्भात उदा. अंतर्गत परीक्षा, गुणांबद्दल काही तक्रार असल्यास किंवा इतर काही परीक्षेशी संबधित तक्रारी मांडल्या जातात. आणि त्याबददल सविस्तर चर्चा करण्यात येवून निर्णय दिला जातो. परंतु या वर्षी परीक्षेच्या संदर्भात कोणत्याही विद्यार्थीची तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. सदर समितीच्या या शैक्षणिक वर्षामध्ये दोन सभा झाल्यात पहिली सभा ऑक्टोबर महिन्यामध्ये व दुसरी सभा मार्च अखेर घेण्यात आली.

**प्रा. डॉ. पी.आर.महाजन**
परीक्षा तक्रार निवारण समिती

## पर्यावरण अभ्यास मंडळ शैक्षणिक वर्ष २०१९-२०

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या अभ्यासक्रमा नुसार महाविद्यालयात प्रथम वर्ष कला व विज्ञान वर्गासाठी पर्यावरण हा विषय सक्तीचा करण्यात आलेला आहे. पर्यावरण संतुलनासाठी महाविद्यालयात दरवर्षी वृक्षारोपण केले जाते. पर्यावरणाबद्दल संपूर्ण ज्ञान विद्यार्थ्यांना आवश्यक आहे. त्यासाठी पर्यावरण अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. प्रथम वर्ष कला व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्याकडून पर्यावरणावर आधारित लघुप्रकल्प तयार करण्यात येतात. लघुप्रकल्प तयार करत असतांना महाविद्यालय परिसरातील वेगवेगळ्या वनस्पतींचा ही अभ्यास करतात.

**प्रा. आर. व्ही. भोळे**

समन्वयक

---

## मराठी वाङ्‌मय मंडळ

मराठी मातृभाषज्ञ असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याची अभिरुची निर्माण व्हावी, शब्दसंपत्ती वाढावी तसेच कल्पनाशक्तीचा विकास व्हावा या उद्देशाने मराठी वाङ्‌मय मंडळाची स्थापना दरवर्षी करण्यात येते. या मंडळामार्फत वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा यासारखे विविध उपक्रम राबविले जातात.

मराठी वाङ्‌मयमंडळाची स्थापना १६ जुलै २०१९ रोजी मंगळवारी सकाळी दहा वाजता गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून करण्यात आली. यावेळी कलाशाखेच्या उपप्राचार्या प्रा.डॉ. नीता वाणी यांनी गुरुचे महत्व जीवनात कसे असते ते सांगितले. तसेच प्रमुख वक्त्या प्रा.डॉ. रेखा पाटील यांनी मराठी साहित्य हे व्यासोच्छिष्ट असल्याचे सांगितले. महर्षी व्यास यांनी लिहिलेला महाभारतात विविध प्रकारची व्यक्तिचित्रणे, संघर्ष वर्णने, प्रसंगनिर्मिती केलेली आहे. प्रा. के.एल. हिरोळे यांनी बौद्ध धर्मात प्रचलित असलेल्या गुरुशिष्य परंपरेविषयीची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

मराठी साहित्यात निसर्गकवी म्हणून प्रसिद्ध असलेले बालकवी याची जयती १३ ऑगस्ट २०१९ रोजी साजरी करण्यात आली. तसेच १४ ऑक्टोबर २०१९ रोजी सोमवारी 'वाचन–प्रेरणा दिवस' माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. 'प्रसारमाध्यमांमध्ये प्रचलित असलेली 'स्त्री' ची प्रतिमा' या विषयावर निबंधस्पर्धा घेण्यात आली. तसेच 'स्त्रीभ्रूणहत्या' या विषयावर वक्तृत्त्वस्पर्धा घेण्यात आली.

दुसऱ्या सत्रात १ जानेवारी २०२० ते १५ जानेवारी २०२० या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा' साजरा करण्यात आला. २१ फेब्रुवारी २०२० रोजी जागतिक मातृभाषा दिन व २७ फेब्रुवारी २०२० रोजी मराठी राजभाषा दिनाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

विविध कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी मा.प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने, उपप्राचार्य डॉ. नीता वाणी, उपप्राचार्य डॉ.पी.आर. महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील, प्रा. एम.के. सोनवणे, प्रा. दिलीप सोनवणे यांच्या परिश्रमाने विविध उपक्रम यशस्वी झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य, उपप्राचार्य, मराठी वाङ्‌मय मंडळाच्या अध्यक्षा सदस्य व प्राध्यापक वृंद यांनी कौतुक केले.

**प्रा.डॉ. रेखा पी. पाटील**

समन्वयक

# मराठी विभाग अहवाल

ऐनपूर परिसरातील कला शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुरुवातीपासून मराठी हा विषय विशेष स्तरावर सुरु करण्यात आला. तसेच २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून पदव्युत्तर स्तरावर विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यात आला. सदर विभागात खालील प्राध्यापक कार्यरत आहेत.

१) प्रा.डॉ. रेखा प्रमोद पाटील - विभाग प्रमुख

२) प्रा.एम.के.सोनवणे - समन्वयक, पदव्युत्तर विभाग

३) प्रा. दिलीप सोनवणे

शै. वर्ष २०१९-२० मध्ये मराठी विशेष स्तराच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल पद्मालय येथे नेण्यात आली. या स्थळाचे सांस्कृतिक महत्त्व सहली दरम्यान सांगण्यात आले. या सहलीचे आयोजन प्रा.डॉ.रेखा प्रमोद पाटील आणि प्रा.एम.के.सोनवणे यांनी केले.

मराठी विभागाच्या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा निकाल समाधानकारक आहे. या वर्षातील गुणवत्ताधारक विद्यार्थी पुढील प्रमाणे होत.

**प्रथम वर्ष कला -**

मराठी विषयात प्रथम क्रमांक - पाटील मोनाली गणेश

**द्वितीय कला मराठी विशेष स्तर**

प्रथम क्रमांक - पाटील निकिता बाळू (७३.३३%)

द्वितीय क्रमांक - पाटील शुभांगी शिवाजी (७२.५०%)

तृतीय क्रमांक - चौधरी रुपाली पांडूरंग (७०.१७%)

**तृतीय वर्ष कला मराठी विशेष स्तर**

प्रथम क्रमांक - गायकवाड मनोहर बाळू (६९.७१%)

द्वितीय क्रमांक - चौधरी भाग्यश्री अनिल (६८.५४%)

तृतीय क्रमांक - भोई माधुरी रमेश (६८.४२%)

**पदव्युत्तर स्तर - मराठी (एम.ए.)**

प्रथम क्रमांक - महाजन विशाल ईश्वर (६८.६९%)

द्वितीय क्रमांक - साखरे राजनंदिनी कांतिलाल (६६.६९%)

तृतीय क्रमांक - सैंदाणे शोभा लक्ष्मण (६५.५०%)

सर्व गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना वार्षिक पारितोषिक वितरण समारोह प्रसंगी रोख बक्षिस देऊन गौरविण्यात आले.

**प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील**
मराठी विभाग प्रमुख

# अर्थशास्त्र विभाग
# अहवाल वर्ष २०१९-२०

ऐ.प.शि. प्रसारक मंडळ संचलित स.व.प कला व विज्ञान महाविद्यालयात सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राचे ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून अर्थशास्त्र विषय विशेषस्तर ठेवण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून एम.ए. अर्थशास्त्र महाविद्यालयात सुरु करण्यात आले. अर्थशास्त्र विभागात विभाग प्रमुख म्हणुन प्रा.डॉ. नीता एस. वाणी असून प्रा.व्ही.एच. पाटील, प्रा. ज्ञानेश्वर कोळी कार्यरत आहे. शैक्षणिक वर्ष २०१८–१९ चा अर्थशास्त्र विभागाचा निकाल पुढील प्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **एस.वाय.बी.ए. :–** | प्रथम क्रमांक | – | पाटील निकिता नितीन | – | ७६.९२% |
| | द्वितीय क्रमांक | – | चौधरी प्रगती रामदास | – | ७२.०८% |
| | तृतीय क्रमांक | – | पाटील भाग्यश्री राघो | – | ७१.३३% |
| **टी.वाय.बी.ए. :–** | प्रथम क्रमांक | – | चौधरी अश्विनी देवराम | – | ८.८३% |
| | द्वितीय क्रमांक | – | तायडे जितेंद्र भास्कर | – | ८.७१% |
| | तृतीय क्रमांक | – | राजपूत शांताराम गोकुळसिंग | – | ८.६३% |

अर्थशास्त्र विभागामार्फत अर्थशास्त्र व नियोजन मंडळाची स्थापना करण्यात येते. या मंडळामार्फत पुढील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

दिनांक – १/८/२०१९ – उद्घटान व वक्तृत्त्व स्पर्धा (विषय–लोकमान्य टिळकांचे जिवन व कार्य)

निकाल – प्रथम क्रमांक – शुभांगी गणेश पाटील
द्वितीय क्रमांक – अश्विनी रविंद्र पाटील
तृतीय क्रमांक – धनश्री जगजीवन मोरे

दिनांक – ६/९/२०१९ – वेलकम कार्यक्रम

दिनांक – १२/९/२०१९ – निबंध स्पर्धा (विषय – भारतातील वर्तमानकालीन मंदीसदृश परिस्थिती–आव्हान)

निकाल – प्रथम क्रमांक – पाटील माधुरी नारायण
द्वितीय क्रमांक – पाटील निकिता नितीन
तृतीय क्रमांक – महाजन गायत्री प्रभाकर

दिनांक – ४/२/२०२० – नवीन अर्थसंकल्पावर चर्चासत्र

दिनांक – ८/२/२०२० – शैक्षणिक सहल

दिनांक – ९/३/२०२० – निरोप समारंभ ( टी.वाय.बी.ए.) व परीक्षेबाबत मार्गदर्शन

**प्रा.डॉ. नीता एस. वाणी**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

## व्यसनमुक्ती युवा मंच अहवाल

महाविद्यालयीन युवकांचा शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर अभ्यासाव्यतिरिक्त उपक्रमातील सहभाग वाढावा, युवकांचे आरोग्य सुदृढ होवून ते देशाचे भावी निरोगी नागरीक तयार व्हावे या उद्देशाने महाविद्यालयात व्यसनमुक्ती युवा मंचाची स्थापना करण्यात येते या मंचाचे उपक्रम योग्य रितीने चालावे म्हणून विद्यार्थी व प्राध्यापक मिळून मंडळ स्थापन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने अध्यक्ष तर प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे सचिव म्हणून कार्य करीत आहे.

महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ मोठ्या अक्षरामध्ये नियमांचा बोर्ड तयार केला असुन त्यात गुटखा बंदीच्या सुचना दिलेल्या आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये नशा होणाऱ्या पदार्थाचे ज्ञान अवगत व्हावे यासाठी गुटखा बंदीची मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्याकडून खिशातील गुटखा पुड्या जमा करुन महाविद्यालयाच्या प्रांगणात होळी करण्यात आली. विद्यार्थ्यांकडून आजपासून पुढे गुटखा, नशीले पदार्थ खाणार नाही अशी प्रतिज्ञा घेतली. यावेळी महाविद्यालयातील युवा मंचाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

राष्ट्र निकोप राहण्यासाठी व्यसनमुक्त युवकांची गरज या विषयांवर प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने यांचे मार्गदर्शन पर व्याख्यान झाले. वेळोवेळी शासन विद्यापीठाद्वारे व्यसनमुक्ती बाबतचे उपक्रम महाविद्यालयात राबविण्यात येतात. व्यसनमुक्ती युवा मंच अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. या कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंचाचे सदस्य प्रा.व्ही.एच. पाटील, डॉ.एस.ए. पाटील, प्रा.एस.पी. उमरीवाड, उपप्राचार्य डॉ.पी.आर. महाजन, डॉ. नीता एस. वाणी, यांचे सहकार्य लाभले. तसेच प्रा. व्ही.एन. रामटेके, प्रा.डॉ. पी.आर. गवळी, प्रा. एनयू. बारी, यांनी कौतुक व अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली मंचाचे सदस्य प्रा. डॉ. एस. ए. पाटील, प्रा. व्ही. एच. पाटील व प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी सहकार्य केले.

**डॉ. आर.व्ही. भोळे**
समन्वयक

---

## ओ.बी.सी.सेल अहवाल

शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये ओ.बी.सी. सेल च्या माध्यमातून पहिली सभा जुलै महिन्यमध्ये घेण्यात आली त्याप्रसंगी सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना एकत्रित जमा करुन ओबीसीच्या विद्यार्थ्याकरिता असलेल्या विविध योजनांची माहिती करुन दिली. राजर्षी शाहू महाराज, इ.बी.सी. इ. माहिती देण्यात आली. वर्षभरामध्ये ओ.बी.सी. च्या विद्यार्थ्याला मार्गदर्शन व मदत करण्यात आली. जास्तीत जास्त लाभ विद्यार्थीपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशा पध्दतीने ओ.बी.सी. सेवेचे कार्य चालु असते. शेवटची सभा मार्च अखेर घेण्यात येवून वर्षाचा लेखाजोखा मांडण्यात आला.

**प्रा. डॉ. पी.आर.महाजन**
ओ.बी.सी.सेल.

## परीक्षा समिती

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनासाठी प्रथम व द्वितीय सत्रामध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या अभ्यासक्रमानुसार परीक्षांचे आयोजन करण्यात आले. प्रथम सत्रामध्ये ३ सप्टेंबर २०१९ ते ५ सप्टेंबर २०१९ आणि २३ सप्टेंबर २०१९ ते २६ सप्टेंबर २०१९ या कालावधीत कला व विज्ञान शाखेतील सर्व वर्गांच्या अंतर्गत परीक्षा आयोजित करण्यात आल्यात. तसेच द्वितीय सत्रामध्ये २७ जाने २०२० ते २९ जानेवारी २०२० आणि १० फेब्रुवारी २०२० ते १२ फेब्रुवारी २०२० या कालावधीत परीक्षेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या परीक्षा सुरळित पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा समिती चेअरमन प्रा. एस.आर. इंगळे व डॉ. आर.व्ही. भोळे यांनी सहकार्य केले.

**प्रा. एस.आर. इंगळे**
समन्वयक

## "ज्ञानगंगोत्री हस्तलिखित"

महाविद्यालयीन आयुष्यामध्ये विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे आवश्यक असते. त्यासाठी महाविद्यालयातील सर्व मंडळे व विविध समित्यांमार्फत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे कार्य सदर ज्ञानगंगोत्री हस्तलिखित मंडळ, सुक्ष्म लेखन कौशल्याला पुढे आणून लिखाणासाठी एक हक्काचे मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमधील विविध विषया वरील लेख अथवा कविता आणून समितीतील प्राध्यापकांकडून तपासून घेतात, त्यावर योग्य मार्गदर्शन करुन सुधारणा करतात. सुधारणा झाल्या नंतर ते साहित्य भित्ती फलकावर लावण्यात येते.

ज्ञानगंगोत्री या हस्तलिखितांचे उद्घाटन या चालु शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये ऑगस्ट महिन्याच्या प्रथम आठवड्यात मा. प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी समितीतील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. दर पंधरा दिवसांनी या भित्ती पत्रकावरील हस्तलिखित साहित्य बदलविण्यात येते. या उपक्रमाच्या यशास्वितेसाठी प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.डॉ.रेखा पाटील व प्रा.एन.यु.बारी, प्रा.डॉ. पी.आर.गवळी आणि विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले

**प्रा. डॉ. पी. आर. गवळी**
समन्वयक

# मानसशास्त्र विभाग अहवाल २०१९-२०

महाविद्यालयात मानसशास्त्र विभागातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळाप्रवेश हा विद्यार्थी दिवस म्हणून दि. ७/११/२०१९ रोजी साजरा करण्यात आला. विद्यार्थी दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विषयावर मानसशास्त्रचे विभाग प्रमुख प्रा.व्ही.एन.रामटेके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्यार्थी जीवन कसे जगले असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता बारी या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता प्रा. व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.के.एल.हिरोळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पी.आर.गवळी यांनी केले. व कार्यक्रमाची सांगता झाली.

महाविद्यालयात मानसशास्त्र विभागातर्फे मानवी हक्क दिन दि. १०/१२/२०१९ रोजी साजरा करण्यात आला. मानसशास्त्राचे विभाग प्रमुख प्रा. व्ही.एन.रामटेके विद्यार्थी समुपदेशन केंद्र व चाचणी केंद्र मानसशास्त्र विभाग सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्काचे तत्व संविधानाच्या कलम १४ ते कलम ३२ पर्यंत समावेश असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्काच्या जाहिरनाम्या विषयी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता बारी या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता प्रा.व्ही.एन.रामटेके, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.के.एल.हिरोळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.कु.दिपाली जाधव यांनी केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

ऐनपूर येथील स.व.प. महाविद्यालयात मानसशास्त्र विभागा मार्फत ३ जानेवारी २०१९ रोजी सावित्रीबाई फुले जयंती दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य जे.बी.अंजने होते तर प्रमुख वक्ते प्रा.डॉ.सौ.रेखा पाटील होत्या. त्यांनी सावित्रीबाईच्या जीवनातील समस्या व जीवन कार्याची महती सांगितली. तसेच प्रा.व्ही.एन.रामटेके यांनी सावित्रीबाई यांची महिला शिक्षण कार्याबद्दल माहिती सांगितली. तसेच प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल बोलताना म्हटले की. स्त्री, शुद्र आणि बहुजनातील अज्ञान व अंधश्रध्दशिक्षणाच्या अस्त्राने दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या लेखन कार्याचा व जीवन कार्याचा आढावा घेतला. आणि कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी फुले दांपत्याने स्त्रीशिक्षण, शेतकरी आणि शुद्रातिशुद्र यांना ज्ञानाच्या माध्यमाने जागृत करण्याचे कसे प्रयत्न केले आणि समाज जागृत करण्यासाठी समाजिक विटम्बनेचा त्रास सहन केला. आजच्या आधुनिक काळातील स्त्री विकासाचा पाया रोवला गेला आणि आधुनिक काळातील स्त्री सशक्त बनली असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. दिपाली जाधव ह्या विद्यार्थिनीने केले. तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.पी.आर.गवळी यांनी केले. कार्याक्रमाचे आयोजन मानसशास्त्र विभागामार्फत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.डी.एस.सोनवणे, प्रा.डॉ.पी.आर.गवळी, प्रा.एस.पी.उमरीवाड सहकार्य केले.

**प्रा.व्ही.एन. रामटेके**
(मानसशास्त्र विभाग प्रमुख)

# मतदान जनजागृती अभियान

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मतदान जनजागृती अभियानाचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. जे.बी. अंजने हे होते. सदर कार्यक्रमात नवीन मतदार नोंदणीसाठी फार्म वाटण्यात आले व विद्यार्थ्यांकडून मतदार नोंदणी फार्म भरुन घेण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नोडल ऑफीसर मतदान जनजागृती अभियान प्रा. हेमंत बाविस्कर, प्रा.एस.पी. उमरीवाड, प्रा.डॉ. पी.आर. महाजन, डॉ.एस.एन. वैष्णव, डॉ. जयंत नेहेते, डॉ.के.जी. कोल्हे, डॉ.एस.ए. पाटील यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मतदान नोंदणीचे आव्हान करण्यात आले.

दि. २६/११/२०१९ रोजी महाविद्यालयात संविधान दिवस साजरा करण्यात आला या कार्यक्रमात मा. प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने व प्रा. एस.पी. उमरीवाड यांनी संविधानचे महत्व पटवून दिले.

दि. २५/१/२०१९ रोजी मतदार दिवस साजरा करण्यात आला. मतदार दिवसानिमित्ताने विद्यार्थ्यांना व सर्व उपस्थितीतांना शपथ देण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. जे.बी. अंजने हे होते. प्रा. एस.पी. उमरीवाड यांनी शपथ दिली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ.पी.आर. महाजन, डॉ. निता वाणी, डॉ. एस.एन. वैष्णव, डॉ. जयंत नेहेते, डॉ.के.जी. कोल्हे, डॉ.एस.ए. पाटील, प्रा.व्ही.एच. पाटील यांनी मेहनत घेतली. तसेच महाविद्यालयात मतदार दिवसानिमित्ताने रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात कु. गायत्री महेंद्र बारी हीने प्रथम क्रमांक कु. तन्वी संदीप पाटील द्वितीय क्रमांक तर कु. श्रद्धा संतोष पाटील हीने तृतीय क्रमांक पटकाविला. रांगोळी स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून प्रा.डॉ. रेखा पाटील, प्रा.डॉ. निता वाणी, प्रा. रुपाली बऱ्हाटे, प्रा.मोहिनी भंगाळे, प्रा. मनिषा महाजन यांनी काम पाहिले. तसेच या दिवशी फैजपूर येथे महाविद्यालयाला मतदान जनजागृती अभियान चांगल्या प्रकारे राबविल्यामुळे मा. जिल्हाधिकारी श्री. अविनाश ढाकणे यांच्याहस्ते व मा.कुलगुरु डॉ.पी.पी. पाटील, मा.प्रांताधिकारी श्री. अजित थोरबोल व मा. तहसिलदार उषाबहुगुणे यांच्या उपस्थित उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरवण्यात आले.

**प्रा. एस.पी.उमरीवाड**
सहाय्यक नोडल ऑफिसर

**प्रा. हेमंत बाविस्कर**
नोडल ऑफिसर
मतदान जनजागृती अभियान

# बक्षिसासाठी शिक्षणप्रेमी देणगीदारांची नांवे

| अ. क्र. | बक्षीसासाठी शिक्षण प्रेमी देणगीदारांची नांवे | रक्कम |
|---|---|---|
| १) | श्री. नारायण शामू महाजन | १०००=०० |
| २) | कै. गंभीर हरी महाजन | १०००=०० |
| ३) | श्री. प्रकाश राजाराम चौधरी | १०००=०० |
| ४) | कै. विठ्ठल किसन पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. युवराज विठ्ठल पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ५) | श्री. तुकाराम गरबड पाटील | १०००=०० |
| ६) | श्री. माधव तोताराम पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. रघुनाथ माधव पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ७) | श्री. भगवान फकिरा महाजन | १०००=०० |
| ८) | श्री. सुरेशचंद्र नंदलाल जैस्वाल | १०००=०० |
| ९) | कै. दत्तु किसन पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. सुनिल भगवान पाटील यांचेकडून | १०००=०० |
| १०) | श्री. दत्तु सोनजी पाटील | १०००=०० |
| ११) | श्री. गणेश जिवराम महाजन | १०००=०० |
| १२) | कै. एकनाथ रघुनाथ पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. सुदेश एकनाथ पाटील यांचेकडून | १०००=०० |
| १३) | कै. डिगंबर राजाराम पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. रमेश डिगंबर पाटील (निंबोल) यांचेकडून | २०००=०० |
| १४) | कै. जगन्नाथ राजाराम पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. विजय जगन्नाथ पाटील (निंबोल) यांचेकडून | १०००=०० |
| १५) | कै. बाजीराव रामू पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. मोहन बाजीराव पाटील यांचेकडून | ५००=०० |
| १६) | श्री. श्रीराम तुकाराम महाजन | ५००=०० |
| १७) | कै. लक्ष्मण शामजी महाजन यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. वसंत लक्ष्मण महाजन (चिनावल) यांचेकडून | १०००=०० |
| १८) | श्री. श्रीराम नारायण पाटील | १०००=०० |
| १९) | कै. पुना गणू पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. प्रल्हाद मधुकर पाटील यांचेकडून | १०००=०० |
| २०) | श्री. दत्तात्रय तुकाराम महाजन | १०००=०० |
| २१) | कै. रघुनाथ शामू पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. गणेश रघुनाथ पाटील यांचेकडून | १५००=०० |
| २२) | कै. बाजीराव किसन पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. पांडूरंग बाजीराव पाटील यांचेकडून | १०००=०० |
| २३) | श्री. डिगंबर गणपत चौधरी | १०००=०० |
| २४) | श्री. वामन बाबा पाटील | १०००=०० |
| २५) | श्री. बाजीराव कांगडू पाटील | ५००=०० |

| अ. क्र. | बक्षीसासाठी शिक्षण प्रेमी देणगीदारांची नांवे | रक्कम |
|---|---|---|
| २६) | कै. गंभीर भगवान चौधरी यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. अरुण गंभीर चौधरी यांचेकडून | १०००=०० |
| २७) | श्री. डॉ. डी. पी. वारके | १०००=०० |
| २८) | श्री. गोपाल राजाराम चौधरी | १०००=०० |
| २९) | कै. भागवत बाजीराव महाजन यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. किशोर भागवत महाजन यांचेकडून | १०००=०० |
| ३०) | कै. ओंकार शिवराम चौधरी (विटवे) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. जगन्नथ ओंकार चौधरी यांचेकडून | १०००=०० |
| ३१) | कै. काशिराम नाना पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. किशोर काशिराम पाटील (बलवाडी) यांचेकडून | १०००=०० |
| ३२) | कै. बाजीराव नाना पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. जगन्नाथ बाजीराव पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ३३) | कै. लक्ष्मीबाई नारायण पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. विनायक नारायण पाटील (बलवाडी) यांचेकडून | १०००=०० |
| ३४) | कै. गयाबाई विठ्ठल पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. गोपाल विठ्ठल पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ३५) | कै. तुकाराम खुशाल पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. गोपाल तुकाराम पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ३६) | कै. सिताराम केशव महाजन (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. रघुनाथ सिताराम महाजन यांचेकडून | १०००=०० |
| ३७) | कै. हेमंत बाबुराव अंजने (मांजरोद) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्राचार्य, डॉ. जे. बी. अंजने यांचेकडून | १०००=०० |
| ३८) | सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | उपप्राचार्य, डॉ. के. जी. कोल्हे यांचेकडून | १०००=०० |
| ३९) | कै. विठ्ठल आनंदा भोळे यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे यांचेकडून | १०००=०० |
| ४०) | कै. सौ. बेबीबाई नामदेव बारी (जळगाव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. नितीन उत्तमराव बारी यांचेकडून | १०००=०० |
| ४१) | कै. सौ. रुख्मीणीबाई बाबुराव अंजने (मांजरोद) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्राचार्य, डॉ. जे. बी. अंजने यांचेकडून | १०००=०० |
| ४२) | प्रा. दत्ता पाटील (निंबोल) ह. मु. रावेर | ५०००=०० |
| ४३) | कु. ज्योती गोपाल पाटील (विटवा) | ५००=०० |
| ४४) | कै. बाबुराव बंडू अंजने (मांजरोद) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. के. बी. अंजने कृषी अधिकारी (पनवेल) यांचेकडून | १०००=०० |
| ४५) | कै. अर्जून दगडू कोल्हे (आसोदा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | उपप्राचार्य, डॉ. के. जी. कोल्हे यांचेकडून | १०००=०० |
| ४६) | कै. सौ. कविता सतीष पाटील (तांदलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. डॉ. एस. ए. पाटील यांचेकडून | १००८=०० |
| ४७) | कै. सी. एच. पाटील (निवृत्त आयकर अधिकारी, जळगाव) | |
| | यांचे स्मृती प्रित्यर्थ श्री. ओंकार सी. पाटील यांचेकडून | २०००=०० |

| अ. क्र. | बक्षीसासाठी शिक्षण प्रेमी देणगीदारांची नांवे | रक्कम |
|---|---|---|
| ४८) | कै. विष्णू लक्ष्मण बऱ्हाटे (निंभोरा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. अनिल विष्णू बऱ्हाटे यांचेकडून | ५००=०० |
| ४९) | कै. शकिन तडवी (आडगांव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. जावेद याकुब तडवी यांचेकडून | १०००=०० |
| ५०) | कै. रघुनाथ सोमा काळे (जळगांव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. मनोज अनंत काळे यांचेकडून | २०००=०० |
| ५१) | सहकार मित्र श्री. चंद्रकांत हरी बढे सर (वरणगांव) | २१००=०० |
| ५२) | कै. सौ. राधाबाई रामकृष्ण महाजन (खिरोदा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. डॉ. पी. आर. महाजन यांचेकडून | ११११=०० |
| ५३) | श्री. भागवत विश्वनाथ पाटील (निंबोल) | १०००=०० |
| ५४) | कै. नारायण शिवराम महाजन (ऐनपूर) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. वसंत नारायण महाजन यांचेकडून | १०००=०० |
| ५५) | कै. ए. एम. पाटील (जळगाव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे, डॉ. पी. आर. महाजन, प्रा. एस. आर. इंगळे | |
| | डॉ. के. जी. कोल्हे, प्रा. ए. जी. सरोदे यांचेकडून | १००१=०० |
| ५६) | कै. एम. आर. पंजे (जळगाव) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. जे. एम. पंजे यांचेकडून | ५००=०० |
| ५७) | कै. विठ्ठल राजाराम पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. रविंद्र विठ्ठल पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ५८) | कै. नारायण गरबड पाटील (बलवाडी) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | श्री. विनायक नारायण पाटील यांचेकडून | १०००=०० |
| ५९) | श्री. डिगंबर लक्ष्मण पाटील (निंभोरा) | १५००=०० |
| ६०) | कै. प्रा. एन. डी. चौधरी (खिरोदा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. वंदना राणे यांचेकडून | १०००=०० |
| ६१) | गं. भा. नितुबाई भ्र. दयाराम पाटील (रेंभोटा) यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | डॉ. सिताराम दयाराम पाटील (रेंभोटा) यांचेकडून | ११२१=०० |
| ६२) | कै. हेमंत प्रमोद पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ | |
| | प्रा. प्रमोद सिताराम पाटील (रावेर) यांचेकडून | ११५१=०० |
| ६३) | कै. तापीबाई काशीनाथ चौधरी (भोकरी) यांचे स्मृतीप्रित्यर्थ | |
| | श्री. मधुकर काशीनाथ चौधरी यांचेकडून | ३०००=०० |
| ६४) | कै. हरी लक्ष्मण चौधरी (पिंप्रीनांदू) यांचे स्मृतीप्रित्यर्थ | |
| | श्री. मधुकर हरी चौधरी यांचेकडून | १०००=०० |
| ६५) | कै. शामू सांडू पाटील यांचे स्मरणार्थ | |
| | श्री. काशीनाथ शामू पाटील (ऐनपूर) यांचेकडून | १५००=०० |
| ६६) | श्री. रामदास शिवराम चौधरी (वाघाडी) | १०००=०० |
| ६७) | कै. नामदेव वना झोपे यांचे स्मरणार्थ | |
| | प्रा. सचिन नामदेव झोपे यांचेकडून | ५००=०० |
| ६८) | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय वाचक पुरस्कारासाठी | |
| | प्रा. राहूल भिकाजी खंडारे यांचेकडून | १०००=०० |
| ६९) | कै. रमेश लहू हेरोळे यांचे स्मरणार्थ | |
| | प्रा. किसन लहू हेरोळे यांचेकडून | १०००=०० |

| अ. क्र. | बक्षीसासाठी शिक्षण प्रेमी देणगीदारांची नांवे | रक्कम |
|---|---|---|
| ७०) | कै. चंद्राबाई विठ्ठल भोळे यांचे स्मरणार्थ<br>प्रा. डॉ. रमेश विठ्ठल भोळे यांचेकडून | १०००=०० |
| ७१) | कै. सुनंदा व कै. रमेश सिताराम पाटील (भुविकास बँक, रावेर) यांच्या<br>स्मरणार्थ प्रा.डॉ.व्ही.आर. पाटील उपप्राचार्य श्री.व्ही.एस. नाईक कॉलेज,<br>रावेर यांचेकडून | ११००=०० |
| ७२) | बुद्धवासी कमलाबाई गणपत तायडे रा. निंबोल यांच्या स्मरणार्थ<br>कु. मोहिनी अशोक तायडे यांचेकडून | २०००=०० |
| ७३) | सावित्रीबाई फुले यांच्या स्मरणार्थ (तृतीय वर्ष इतिहास विषयात सर्वप्रथम)<br>कु. नम्रता ज्ञानेश्वर वाघ यांचेकडून | १५००=०० |
| ७४) | रमाबाई आंबेडकर यांच्या स्मरणार्थ (तृतीय वर्ष विज्ञान वर्गात सर्वप्रथम)<br>कु. नम्रता ज्ञानेश्वर वाघ यांचेकडून | १५००=०० |
| ७५) | कै. बाबुराव उखर्डु महाजन (विटवे) यांचे स्मृतिप्रित्यार्थ<br>श्री. भास्कर बाबुराव महाजन यांचेकडून | १०००=०० |
| ७६) | श्री. श्रीराम दयाराम पाटील<br>(संचालक साईराम प्लॅस्टीक ॲन्ड इरिगेशन रावेर) यांचेकडून | ५००=०० |
| ७७) | श्री. विजय जयराम चौधरी (सर) विटवा<br>(उपशिक्षक ल.वि. पाटील माध्य. विद्यालय, निंबोल) | १५०१=०० |
| ७८) | सौ. अलका विजय चौधरी विटवा<br>(माजी सभापती पं.स.रावेर) | १५०१=०० |
| ७९) | प्रा.डॉ. दिपक भगवान पाटील (ऐनपूर)<br>कै.भगवान लक्ष्मण पाटील यांचे स्मरणार्थ | ५००१=०० |
| | **एकूण रुपये –** | **९४०९५=००** |

# पारितोषिक व शिष्यवृत्ती योजना

महाविद्यालयामध्ये विशेष पारितोषिक व शिष्यवृत्ती योजनेसाठी प्रा. श्री. भास्करराव आनंदराव पाटील व सौ. निर्मलाबाई भास्करराव पाटील रा. निंबोल ह.मु. पुणे यांचेकडून २,००,०००/- रू. ठेव म्हणून मिळालेले आहेत. त्या रकमेवर मिळणाऱ्या व्याजातून महाविद्यालयातून पारितोषिक व शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेच्या खालील नमुद केलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष निहाय लाभ मिळत आहे.

**शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०**

## १) पारितोषिक योजना :

अ) श्रीमती रंभाबाई आनंदराव पाटील यांच्या स्मरणार्थ सौ. निर्मलाबाई भास्करराव पाटील रा. निंबोल ह. मु. पुणे यांचेकडून **मुलींसाठी** व कै. आनंदराव भगवान पाटील निंबोल यांच्या स्मरणार्थ प्रा.श्री. भास्करराव आनंदराव पाटील रा.निंबोल, ह.मु. पुणे यांचेकडून **मुलांसाठी** पारितोषिक योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेत पात्र विद्यार्थ्यांची यादी

| अ.क्र. | विद्यार्थी/विद्यार्थिनींचे नांव | वर्ग | रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | शैलेंद्र मुरलीधर पाटील (मुलांमधून) | तृतीय वर्ष विज्ञान | १०००/- |
| २ | अंकिता रमेश चौधरी (मुलींमधून) | तृतीय वर्ष विज्ञान | १०००/- |
| ३ | जितेंद्र भास्कर तायडे (मुलांमधून) | तृतीय वर्ष कला | १०००/- |
| ४ | अश्विनी देवराम चौधरी (मुलींमधून) | तृतीय वर्ष कला | १०००/- |
| ५ | प्रणव किशोर चौधरी (मुलांमधून) | १२ वी विज्ञान | १०००/- |
| ६ | प्रिती अशोक महाजन (मुलींमधून) | १२ वी विज्ञान | १०००/- |

## २) शिष्यवृत्ती योजना :

कै. आनंदराव भगवान पाटील रा. निंबोल यांच्या स्मरणार्थ प्रा. श्री. भास्करराव आनंदराव पाटील रा. निंबोल ह. मु. पुणे यांच्या कडून महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एका गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस वरील प्रमाणे पारितोषिक वाटप झाल्या नंतर उर्वरित व्याजाची रक्कम शिष्यवृत्तीच्या स्वरुपात देण्यात येते. शै वर्ष २०१८-१९ मध्ये खालील विद्यार्थी/विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती देण्यात आली.

| अ.क्र. | विद्यार्थी/विद्यार्थिनींचे नांव | वर्ग | रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | युक्ता ज्ञानेश्वर चौधरी | द्वितीय वर्ष विज्ञान | ३०००/- |
| २ | योगिता तुकाराम पाटील | द्वितीय वर्ष विज्ञान | ३०००/- |

## हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड शिष्यवृत्ती २०१९-२०

हिंदुस्थान पेट्रोलीयम कॉर्पोरेशन लिमिटेड (एच.पी.सी.एल.) शिष्यवृत्तीसाठी बी.ए./बी.एस.सी. प्रथम/द्वितीय व तृतीय वर्ष कला व विज्ञान वर्गातील एकूण १३७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी १३२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली. या १३२ विद्यार्थ्यांना हिंदुस्थान पेट्रोलियम कोपॅरेशन लिमिटेड (एच.पी.सी.एल.ने) तर्फे एकूण रु. ७,४४,७०० रक्कमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. सदर शिष्यवृत्तीचे वाटप एच.पी.सि.एल.चे अधिकारी विभागीय जनरल व्यवस्थापक मा. पलय जांभूळकर, अक्षय टेंभूर्णी असिस्टंट सेल मॅनेजर, जळगाव व अनुरंजन शेट्टी, असिस्टंट रिजनल मॅनेजर नाशिक यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी एच.पी.सी.एल चे समन्वयक प्रा.व्ही.एन. रामटेके यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी महाविद्यालयाच्या विविध विद्यार्थी भिमुख उपक्रमाविषयी माहिती दिली. तर मा. प्रलय जांभूळकर यांनी हिंदुस्थान पेट्रोलियम कोर्पोरेशन लिमिटेड (एच.पी.सी.एल.) विषयी माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीतून मिळालेल्या रक्कमेतून शैक्षणिक साहित्य खरेदी करुन परीक्षेत यश संपादन करावे. व देशाच्या प्रगतीसाठी सतत जागरुक राहावे असे प्रतिपादन केले. प्रा. एस.पी. उमरीवाड यांनी हिंदुस्थान पेट्रोलियम कोर्पोरेशन लिमिटेड (एच.पी.सी.एल.) चे आभार मानले. सदर कार्यक्रमाला प्रा. एन.यु. बारी, डॉ.पी.आर. महाजन, डॉ. नीता वाणी हे उपस्थित होते. सदर शिष्यवृत्तीसाठी सहसमन्वयक प्रा.पी.आर. गवळी, प्रा.एस.पी. उमररीवाड यांचे सहकार्य लाभले.

**प्रा.व्ही.एन.रामटेके**
समन्वयक

---

## शिक्षक पालक संघ समिती अहवाल

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शिक्षण पालक संघाची स्थापना करुन पालकांच्या व त्यांच्या पाल्यांचा समस्या समजून घेवून त्यानुसार विद्यार्थ्यांना सांगण्यात आल्या. तसेच शिक्षकांच्या समस्या समजून घेवून त्यानुसार त्यावर प्राचार्यांनी योग्य ती कार्यवाही व उपाय करुन समस्यांचे निराकरण करण्यात आले. वर्षभरात दोन वेळा शिक्षक-पालक संघांची सभा घेण्यात आली.

**प्रा. एम.के. सोनवणे**
चेअरमन
शिक्षकपालक संघ समिती

## गांधी विचार संस्कार परीक्षा

ऐनपूर परिसर शिक्षकण प्रसारक मंडळाने चालवलेले सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव मार्फत गांधी विचार संस्कार परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेत चौदा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. मा. प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने परीक्षेचे महत्व पटवून दिले. तसेच गांधी विचारांची आजच्या स्थितीत विद्यार्थी व देशांतील प्रत्येक तरुणाला अत्यंत आवश्यकता आहे. गांधीजीचे विचार आत्मसाथ केल्याने मनुष्यांच्या जीवनांत फार परिवर्तन होऊ शकतो. आपण चांगले संस्कार घेऊ शकतो. व एक सुसंस्कारित नागरिक बनू शकतो असे मत त्यांनी मांडले. परीक्षेचे संपूर्ण आयोजन या मंडळाचे समन्वयक प्रा.डॉ. पी.आर. गवळी यांनी केले. प्रा.व्ही.एन. रामटेके यांनी परीक्षेचे काम पाहिले. काही दिवसानंतर गांधी रिसर्च फाऊंडेशन तर्फे जिल्हास्तरीय निकाल जाहिर करण्यात आले. या निकालामध्ये स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालयातील कु. वैष्णवी अशोक पाटील हिने जिल्ह्यात तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशन तर्फे कु. वैष्णवी अशोक पाटील हिला कास्य पदक देण्यात आले व स्मृतिचिन्ह. या यशाबद्दल ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सभासदांनी कौतुक व अभिनंदन केले. तसेच मा. प्राचार्य यांनी सुद्धा, कौतुक व अभिनंदन केले. तसेच डॉ.पी.आर. गवळी, प्रा. एस.पी. उमरीवाड, प्रा. व्ही.एन. रामटेके, उपप्राचार्य डॉ. पी.आर. महाजन, डॉ. नीता एस. वाणी, प्रा. एम.के. सोनवणे, प्रा.डॉ. के.जी. कोल्हे, प्रा. एन.यु. बारी, डॉ. रमेश भोळे व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सुध्दा कौतुक व अभिनंदन केले आहे.

**प्रा.डॉ. पी.आर. गवळी**
समन्वयक

---

## पदार्थविज्ञान विभाग अंतर्गत पदव्युत्तर संशोधन केंद्र

महाविद्यालयामध्ये द्वितीय वर्ष विज्ञान वर्गापर्यंत पदार्थविज्ञान विभाग शिकवला जात असून या विभागास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पदव्युत्तर संशोधन केंद्र मंजूर केलेले आहे. या केंद्रामध्ये प्रा.डॉ.के.जी. कोल्हे यांचय मार्गदर्शनाखाली तीन पीएच.डी. पदवी नोंदणीकृत विद्यार्थी संशोधन कार्य करीत असून केंद्रामार्फत व विभागातर्फे नाविण्यपुर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात येते या शैक्षणिक वर्षामध्ये पदार्थविज्ञान विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रा.डॉ. रविंद्र किनगे व प्रा.डॉ. सतिश चौधरी यांची Innovatives in Physics या संकल्पनेवर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

**प्रा.डॉ. के.जी. कोल्हे**
विभाग प्रमुख

# केळी अभ्यास आणि संशोधन केंद्र अहवाल

महाविद्यालयात शेतकऱ्यांसाठीव संशोधकांसाठी सुरु करण्यात आलेल्या केळी अभ्यास व संशोधन केंद्रामार्फत २९/११/२०१९ रोजी राज्य स्तरीय केळी परीषदेचे आयोजन करण्यात आले. उद्घाटक म्हणून शहादा येथील केळी उत्पादक शेतकरी मकरंद पाटील व अध्यक्ष भागवत पाटील होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने यांनी केले तर परीषदेत कृषी तज्ञ वसंतराव महाजन, प्रा.डॉ. पी.वाय. पेंढारकर, प्राचार्य डॉ. एस.एस. पवार, फार्मसी महाविद्यालय शहादा, चोपडा साखर कारखान्याचे माजी चेअरमन डॉ. सुरेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. परिषदेचे सुत्रसंचलन डॉ. किशोर गोविंद कोल्हे यांनी केले तर आभार डॉ. सतिष पाटील यांनी मानले. सदर परिषदेत १३५ शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन केळी संबंधित अनेक विषयांवर चर्चा केली.

या केंद्रामार्फत दि. ३१ डिसेंबर २०१९ ला कै.डॉ. पंजाबराव देशमुख व्याख्यान माले अंतर्गत क.ब.चौ. उमवि व सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालय केळी अभ्यास व संशोधन केंद्र ऐनपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात क.ब.चौ. उमवि अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत सरोदे यांचे सुक्ष्म जीवाणू व शाश्वत शेती या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन म्हणून व्याख्यान आयोजित करण्यात आले संस्थेचे अध्यक्ष भागवत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाचा परिसरातील ६६ शेतकऱ्यांनी लाभ घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने यांनी प्रास्ताविक केले. सुक्ष्म जीवाणू व शाश्वत शेती विषयी आपल्या मनातील शंका शेतकऱ्यांनी तज्ञ मार्गदर्शक़ांना विचारुन आपले समाधान करुन घेतले. डॉ. प्रशांत सरोदे यांनी आपल्या व्याख्यानात सुक्ष्म जिवाणूंचा शेती उत्पादनावर होणारा परिणाम, वातावरणीय बदल, जमिनीची पोषकता, व शाश्वत शेतीसाठी उपयुक्त अशा माहिती स्त्रोतांची व पद्धतींचा व्याख्यानात विशेष उल्लेख केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक प्रा.डॉ. किशोर कोल्हे यांनी केले व आभार उपप्राचार्य डॉ. प्रविण महाजन यांनी व्यक्त केले.

**प्रा.डॉ. एस. ए. पाटील**
केळी अभ्यास व संशोधन समन्वयक

## खरा तो एकची धर्म

खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ॥धृ.॥
जगी जे हीन अति पतित । जगी जे दीन पददलित
तया जाऊन उठवावे । जगाला प्रेम अर्पावे ॥१॥
सदा जे आर्त अति विकल । जयांना गांजती सकल
तया जाऊन हसवावे । जगाला प्रेम अर्पावे ॥२॥
कुणा ना व्यर्थ शिणवावे । कुणा ना व्यर्थ हिनवावे
समस्ता बुंध मानावे । जगाला प्रेम अर्पावे ॥३॥
प्रभूची लेकरे सारी । तयाला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे । जगाला प्रेम अर्पावे ॥४॥
असे हे सार धर्माचे । असे हे सार सत्याचे
परार्था प्राणही द्यावे । जगाला प्रेम अर्पावे ॥५॥

## बलसागर भारत होवो

बलसाागर भारत होवो । विश्वात शोभुनी राहो ॥धृ॥
हे कंकण करी बांधिये । जनसेवे जीवन दिधले
राष्ट्रार्थ प्राण हे उरले । मी सिध्द मरायाला हो ॥१॥
वैभवी देश चढवीण । सर्वस्व त्यास अर्पिन
तिमीर घोर संहारीन । या बंधु साहाय्याला हो ॥२॥
हातात हात घालून । हृदयास हृदय जोडून
ऐक्याचा मंत्र जपून । या कार्य करायला हो ॥३॥
करि दिव्य पताका घेऊ । प्रिय भारत गीते गाऊ
विश्वात पराक्रम दावू । ही माय निजपदा लाहो ॥४॥
या उठा, या उठा करु हो शर्थ । संपादु दिव्य पुरुषार्थ
हे जीवन ना तरी व्यर्थ । भाग्यसूर्य तळपत राहो ॥५॥

## महाविद्यालयाच्या वाटचालीतील क्षण चित्रे...



रंगोत्सव वार्षिक स्नेहसंमेलनात महाविद्यालयीन विद्यार्थी नृत्य सादर करतांना...

महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने महाविद्यालयात 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत स्वच्छता पंधरवाडा कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने...





महाविद्यालयात आयोजीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रमाच्या निमित्ताने मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने

ऐनपूर परिसर शिक्षक प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.भागवतभाऊ विश्वनाथ पाटील यांच्या हस्ते उत्कृष्ट ग्रंथालय वाचक पुरस्कार स्विकारतांना विद्यार्थीनी कु. महाजन श्वेता पांडूरंग





महाविद्यालयाने मतदान जनजागृती अभियानात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल मा.कुलगुरु डॉ. पी.पी. पाटील, तसेच मा.जिल्हाधिकारी श्री. अविनाश ढाकणे, मा.प्रांताधिकारी श्री. अजित थोरबोले यांच्याहस्ते पुरस्कार स्विकारतांना प्रा.एच.एम.बाविस्कर



प्रा.के.आर. देसाई (उका तरसाडी विद्यापीठ बारडोली, गुजरात) हे राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन करतांना... व्यासपीठावर उपस्थित मान्यवर



राज्यस्तरीय भाषिक अल्पसंख्यांक केळी उत्पादक शेतकरी परिषदेत कृषीभूषण श्री. वसंतराव महाजन ह्यांचे स्वागत करतांना संस्थचे चेअरमन श्री.श्रीराम नारायण पाटील




# महाविद्यालयाची प्रशस्त इमारत